मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » शुक्रवार, २५ एप्रिल २०२५ » वर्ष: ६ » अंक:१२७ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## फवाद खानच्या 'अबीर गुलाल' चित्रपटावर भारतात बंदी

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

काश्मीरधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यानंतर अबीर गुलाल या चित्रपटावर बंदी मागणी होत होती. आता अभिनेत्री वाणी कपूर आणि पाकिस्तानी अभिनेता फवाद खान यांचा आगामी चित्रपट 'अबीर गुलाल'च्या प्रदर्शनास भारतात बंदी घालण्यात आलीय. लोकांचा रोष पाहता सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, पहलगाम हल्ल्यानंतर चित्रपटाची रिलीज डेट आज टळली होती. त्यानंतर अबीर गुलालच्या प्रदर्शनावर भारतात बंदी केली आहे. 'अबीर गुलाल' मधून फवाद खान तब्बल ९ वर्षांनी बॉलीवूडमध्ये वापसी करणार होता. त्याने 'खूबसूरत', 'कपूर अँड सन्स', 'ए दिल है मुश्किल' सारख्या तीन बॉलीवूड चित्रपटांमध्ये काम केले होते.

### अग्राग्रलेख

## खरीखरी

## पाकड्यांचे पेकाट मोडा!

पाकिस्तानची निर्मिती झाली. अगदी तेव्हापासून भारतात नको त्या कारवाया करून, वारंवार भारताच्या निरपराध जनतेला विनाकारण त्रास देण्याचे पाकिस्तानचे हातखंडा प्रयोग त्यांच्या पैदाईशी पासून सुरूच आहेत. १९४८ सालामध्ये पाकिस्तानने जेव्हा पहिला प्रयत्न केला. त्या घोळात अर्धे काश्मीर पाकिस्तानने मिळवले. त्यानंतरही म्हणजेच विलीनीकरणावर सही केल्यावर सुद्धा परकीय घुसखोरांना भारताने पळता भुई थोडी केलेली आहे. मग दोन-तीन युद्धे झाली. त्या दोन-तीन युद्धांमध्ये पाकिस्तानने असा काही मार खाल्ला आहे की, त्यांना जगाला तोंड दाखवणे शक्यच नव्हते. हे करताना पाकिस्तानने अमेरिकेकडून त्यावेळी येणाऱ्या पैशाचा भरमसाठ दुरुपयोग केला. तेव्हा अमेरिकेचे पाकवर भलतेच प्रेम होते. १९७१ सालामध्ये तर अमेरिकेचे जंगी सातवे आरमार पाकच्या मदतीला येणार होते. मात्र तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी तेव्हाच्या सोवियत संघाबरोबर करार करून अमेरिकेला प्रत्युत्तर देण्याची तयारी केली. मात्र त्या दरम्यानच्या काळातच पाकी लष्कराने चक्क शरणागती पत्करली. हे जगजाहीर आहे. त्यानंतर या पाकिस्तानने सरळ युद्ध न करता अतिरेकी कारवाया सुरूच ठेवल्या. हेच अतिरेकी आपल्या उरावर बसणार आहेत. हे त्या पाकच्या राज्यकर्त्यांना समजलेच नाही. आता चोही बाजूकडून कोंडी होत असताना भिकेचे कटोरे घेऊन फिरणाऱ्या पाकिस्तानकडून भारत विरोधी कारवाया बंद होण्याचे नाव घेत नाहीत. आपण बरबाद झालो तरी भारताविरुद्ध कारवाया करणे थांबवणार नाही. हा नापाक पाकिस्तानचा राष्ट्रीय धर्म आहे. परवा काश्मीरच्या अंतरंगात म्हणजेच सीमेपासून बरेच दूर असलेल्या पहेलगाम येथे ज्या पद्धतीने त्या मात्रागमनी अतिरेक्यांनी निरपराधांना गोळ्या घातल्या. ते हरामखोर कोणत्याही परिस्थितीत सुटता कामा नयेत. शासनाने यावेळी अत्यंत कडक पवित्रा घेऊन पाकिस्तानच्या दूतावासाला भारतामधून चालू पडण्याचे आदेश दिलेले आहेत आणि आपल्या दुतावासाला परत बोलावण्याची कृती केलेली आहे. त्यावरून आपल्या सरकारने हे सर्व प्रकरण गांभीर्याने घेतलेले दिसते. सिंधू नदीच्या पाणी वाटपाचा करार संपवल्याने पाकिस्तानला पाणी-पाणी करावे लागेल. हे सुद्धा सत्य आहे. पाकिस्तानच्या नागरिकांना तात्काळ भारत सोडण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. म्हणजेच आता भारताने पाकला त्यांची औकात दाखवलेली आहे. ज्या अतिरेक्यांनी परवाचे जे नरसंहारक कृत्य केले. त्यांचा बोलविता आणि करविता धनी पाकमध्येच लपलेला आहे. त्याला किंमत देणारे पाकिस्तानचे लष्करच आहे. ही बाब १००% खरी आहे. म्हणूनच या खरीखरी मध्ये आम्हाला त्याचा उल्लेख करावासा वाटतो. भारताने इतक्या वेळा पाकिस्तानचे नाक कापलेले आहे की आता पाकड्यांचे नाक दिसतच नाही. फक्त श्वास घेण्यापुरत्या दोन नळ्या किंवा दोन भोकेच दिसतात. सद्यस्थितीमध्ये भारताच्या गृहमंत्र्यांनी आणि पंतप्रधानांसह सर्व अधिकाऱ्यांनी त्यासोबत ज्या ज्या राज्याचे नागरिक मारले गेले आहेत. त्या त्या राज्यांनी अत्यंत कडक पवित्रा घेतलेला दिसतो. पाकिस्तानचे हे जळमट पार नष्ट केल्याशिवाय भारताला स्वस्त बसता येणार नाही. ७१ च्या युद्धात पाकिस्तानचे दोन तुकडे झाले. आतापर्यंत बांगलादेश भारताला आपला समजत होता. पण सध्याचा बांगलादेशचा सर्व अधिकार मिळालेला राज्यकर्ता विनाकारण भारताबरोबर शत्रुत्व वाढवित आहे आणि पाकिस्तानच्या पायाशी लोळण घेत आहे. आता भारतालाही बलुचिस्तान प्रकरणी नक्कीच काहीतरी निर्णय घ्यावा लागेल. परवाचा हल्ला पाकिस्तानला सुखासुखी पचवू देणे. हा माणूसकीचा सत्यानाश ठरेल. त्या नालायक अतिरेक्यांनी जी राक्षसगिरी दाखवली. त्या राक्षसांच्या आणि त्यांच्या राक्षसगिरीचा त्यांच्या इतकाच क्रूरपणे बिमोड करणे. हे आपले प्रथम कर्तव्य समजले पाहिजे. त्या दृष्टीने कारवाई सुरू झाली आहे. ही समाधानाची बाब आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# दहशतवाद्यांनी कल्पना केली नसेल त्यापेक्षा कठोर शिक्षा देणार - पंतप्रधान मोदींचा इशारा

**मधुबनी, दि. २४ वृत्तसंस्था**

जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात भारतातील २६ जणांनी प्राण गमावले आहेत. या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारही आक्रमक झाले असून पाकिस्तानविरोधात शड्डू ठोकला आहे. पाकिस्तानची कोंडी करण्यासाठी पावलं उचलली जात असतानाच त्यांनी दहशतवाद्यांनाही थेट इशारा दिला आहे. आता कल्पनेपेक्षाही मोठी शिक्षा दिली जाणार, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर सभेत म्हटलंय. ते बिहारमध्ये राष्ट्रीय पंचायत राज दिवसाच्या निमित्ताने बोलत होते.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन मिनिटे मौन पाळून या हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली अर्पण केली. तर भाषण संपता संपता त्यांनी दहशतवाद्यांना जाहीर भाषणातूनच थेट इशारा दिला. "मी संपूर्ण जगाला सांगू इच्छितो की भारत प्रत्येक दहशतवाद्याला आणि त्यांच्या पाठीराख्यांना ओळखेल, त्यांचा माग काढेल आणि त्यांना शिक्षा करेल. ज्यांनी हा हल्ला केला आहे त्या दहशतवाद्यांना आणि हल्ल्याचं कटकारस्थान रचणाऱ्यांना त्यांच्या कल्पनेपेक्षाही मोठी शिक्षा मिळणार आहे", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.



जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी बिहारमध्ये सार्वजनिक व्यासपीठावर दिसले. या व्यासपीठावरून पंतप्रधान मोदींनी दहशतवाद्यांना कडक इशारा दिला. पंतप्रधानांनी यावेळी दहशतवाद्यांचा खात्मा करण्याबद्दल भाष्य केले. त्यामुळे आता हे स्पष्ट झालंय की पहलगाममधील दहशतवाद्यांच्या कारवायीनंतर सरकार आता त्यांना योग्य उत्तर देण्याच्या तयारीत आहे.

"पहलगाम हल्ल्याच्या घटनेमुळे संपूर्ण देश दुःखी आहे. सर्व पीडित कुटुंबियांच्या दुःखात सगळा देश त्यांच्यासोबत उभा आहे. ज्यांच्यावर उपचार चालू आहेत ते लवकर बरे व्हावेत यासाठीही सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. या दहशतवादी हल्ल्यात कुणी आपला मुलगा, भाऊ आणि जोडीदार गमावला. त्यातील प्रत्येक जण वेगवेगळे भाषिक होते. या सर्वांच्या मृत्यूवर आपल्या सर्वांचे दुःख, आक्रोश एकसारखा आहे. हा हल्ला फक्त पर्यटकांवरच झाला नाही तर देशाच्या शत्रूंनी भारताच्या आत्म्यावर हल्ला करण्याचे धाडस केले आहे. मी स्पष्ट शब्दात सांगतोय की, ज्यांनी हा हल्ला केला आहे त्या दहशतवाद्यांना आणि हा कट रचणाऱ्यांना त्यांनी कल्पनाही केली नसेल त्यापेक्षा जास्त कठोर शिक्षा दिली जाईल. शिक्षा मिळणारच. आता उरलेल्या दहशतवाद्यांनाही मातीत गाडण्याची वेळ आली असून त्यांचे उरलेले अड्डे नष्ट करण्याची वेळ आली आहे. १४० कोटी भारतीयांची इच्छाशक्ती दहशतवाद्यांच्या प्रमुखांचे कंबरडे मोडून ठेवणार आहे," असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

**नरेंद्र मोदींचे थेट इंग्रजीतून भाषण**

महत्त्वाचं म्हणजे बिहारमध्ये हिंदीतून भाषण करत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अचानक इंग्रजीतून भाषण सुरू केलं. भारताच्या स्पिरिटवर हल्ला करणाऱ्यांना भारत सोडणार नाही, असा जगाला इशारा देत असताना त्यांनी इंग्रजीतून भाषण केलं. ते म्हणाले, आज बिहारच्या मातीतून मी संपूर्ण जगाला सांगतोय की, भारत प्रत्येक दहशतवाद्याला आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्यांना शोधून काढेल आणि कठोर शिक्षा देईल. आम्ही शेवटापर्यंत त्यांचा पाठलाग करू. दहशतवादामुळे भारताचा आत्मा कधीही तुटणार नाही. दहशतवाद्यांना शिक्षा झाल्याशिवाय राहणार नाही. न्याय मिळावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. मानवतेवर विश्वास ठेवणारा प्रत्येकजण आपल्यासोबत आहे. आमच्यासोबत उभे राहिलेल्या विविध देशांच्या लोकांचे आणि त्यांच्या नेत्यांचे मी आभार मानतो, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

## भारताची सिंधू जल कराराला स्थगिती
## पाकिस्तानचा झाला जळफळाट

**इस्लामाबाद, दि.२४ वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला जबाबदार धरत भारताने पाकिस्तानची राजनैतिक कोंडी केली. बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षणविषयक केंद्रीय समितीच्या (सीसीएस) बैठकीनंतर १९६०च्या 'सिंधू जल करारा'स स्थगिती देण्याचा निर्णय घेतला गेला. या निर्णयाला आता पाकिस्तानकडून उत्तर देण्यात आले आहे.

इस्लामाबाद येथे गुरूवारी पाकिस्तानच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची आणि मंत्री गटाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर भारताबरोबर झालेले सर्व द्वीपक्षीय करार स्थगित करण्याचा अधिकार पाकिस्तान वापरू शकतो, असे पाकिस्तानने म्हटले आहे. यात सिमला कराराचाही उल्लेख करण्यात आला आहे.

बुधवारी भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ता विक्रम मिस्री यांनी पत्रकार परिषद घेऊन सिंधू जल कराराला इतिहासात प्रथमच स्थगिती देण्यात येत असल्याचे म्हटले. तसेच अटारी-वाघा सीमा तातडीने बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पाकिस्तानात असलेल्या भारतीय नागरिकांना या मार्गाने १ मेपर्यंत परत येता येईल. दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील संरक्षणविषयक सल्लागारांना आठवड्याभरात भारत सोडण्याचा आदेश दिला गेला होता.

भारताने राजनैतिक कोंडी केल्यानंतर पाकिस्तानचे पंतप्रधान मुहम्मद शाहबाज शरीफ यांनी राष्ट्रीय सुरक्षा समितीची बैठक घेतली. पंतप्रधानांच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले की, सिंधू जल करार स्थगित करण्याच्या भारताच्या निर्णयाचा आम्ही तीव्र शब्दात विरोध करतो. सिंधू जल करारानुसार पाकिस्तानात वाहणाऱ्या पाण्याचा प्रवाह रोखणे किंवा वळविण्याचा प्रयत्न करणे हे युद्धाला चिथावणी दिल्याचे कृत्य समजले जाईल.

याशिवाय भारताच्या मालकीच्या किंवा भारताकडून संचालित केल्या जाणाऱ्या विमान वाहतुकीला पाकिस्तानच्या हवाई क्षेत्रात बंदी घातली जात आहे. भारताबरोबरचा सर्व व्यापार थांबविण्यात येत आहे. तसेच पाकिस्तानकडूनही वाघा बॉर्डर बंद करण्यात येणार आहे. तसेच उच्चायुक्तालयातील कर्मचाऱ्यांची संख्या ३० पर्यंत कमी करणार असल्याचे पाकिस्तानने म्हटले आहे.

पाकिस्तानचे ऊर्जा मंत्री सरदार अवैस लघेरी यांनीही सिंधू जल करार स्थगित केल्याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. लेघारी म्हणाले की, भारताने घाईघाईत हा निर्णय घेतला असून त्यांना या जल युद्धाचे परिणाम भोगावे लागतील. सिंधू जल कराराचे उल्लंघन करणे हे युद्धाचे कृत्य समजले जाईल. तसेच हा निर्णय अवैध आणि भ्याड आहे, असा आरोपही त्यांनी केला. पाण्याच्या प्रत्येक थेंबावर आमचा अधिकार असून आम्ही कायदेशीररित्या, राजकीयदृष्ट्या आणि जागतिक स्तरावर या अधिकाराचे पूर्ण ताकदीनिशी रक्षण करू, असेही लेघारी यांनी म्हटले.

**पाकिस्तानने कोणते निर्णय घेतले?**

- भारतासोबत सुरू असलेला व्यापार बंद. भारताच्या माध्यमातून इतर कोणत्याही देशासोबत व्यापार नाही.
- भारतीयांचा सार्क व्हिसा रद्द करणार.
- भारतीय उच्चायुक्तालयातील लष्कर सल्लागारांना भारतात परतावं लागणार.
- वाघा अटारी बॉर्डर बंद.
- इस्लामाबादमधील भारतीय राजनैतिक अधिकाऱ्यांची संख्या 30वर आणणार.
- भारतीय विमानांसाठी पाकिस्तानी एअरस्पेस बंद.

## सरकारच्या कोणत्याही कारवाईला समर्थन
## सर्वपक्षीय बैठकीत एकमत

**नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था**

जम्मू काश्मीरमधील प्रमुख पर्यटन स्थळांपैकी एक असलेल्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून सुमारे २६ पर्यटकांची हत्या केली. दिल्लीत घडामोडींना वेग आला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने अनेक देशांच्या राजदूतांसोबत एक महत्त्वाची बैठक घेतली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली आणि घडामोडींची सविस्तर माहिती दिली. यानंतर सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत अनेक पक्षांच्या नेत्यांनी हजेरी लावली.



सर्वपक्षीय बैठकीत सुरक्षेत चूक झाल्याच्या प्रश्नावर सरकारतर्फे स्वीकार करण्यात आले की जर चूक झाली नसती तर आज आपण येथे बसलो नसतो.

बैठक संपल्यानंतर बाहेर येताच काँग्रेस खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना राहुल गांधी यांनी सांगितले की, सर्वांनी पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला. सरकारने कोणताही निर्णय घ्यावा, संपूर्ण विरोधी पक्षाचा पाठिंबा असेल, असे राहुल गांधी यांनी स्पष्ट केले. तसेच सर्व पक्षांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे. काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांवर चर्चा झाली. सरकारच्या कोणत्याही प्रकारच्या कारवाईला समर्थन आहे, असे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितले.

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांच्यासह काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी, आप खासदार संजय सिंह, तृणमूल काँग्रेसचे खासदार सुदीप बंडोपाध्याय यांच्यासह अनेक पक्षांचे नेते या सर्वपक्षीय बैठकीला उपस्थित होते.

## जम्मू काश्मीरमध्ये अडकलेले महाराष्ट्रातील पर्यटक मुंबईत परतले

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या विनाशकारी दहशतवादी हल्ल्यानंतर, महाराष्ट्रातील अडकलेल्या पर्यटकांचा पहिला गट गुरुवारी सकाळी मुंबईत सुरक्षित पोहोचला. या घटनेत बाधित झालेल्यांना घरी परत आणण्यासाठी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेनेने हाती घेतलेल्या मोठ्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे.

६५ महाराष्ट्रीय पर्यटकांना घेऊन जाणारे एक विशेष विमान भारतीय वेळेनुसार पहाटे ३:३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्सवर पोस्ट करून याबाबतची माहिती दिली. जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर तेथे अडकून पडलेल्या पर्यटकांपैकी १८४ पर्यटकांना मुंबईला घेऊन जाणारे दुसरे विमान श्रीनगरहून मुंबईकडे रवाना झाले. श्रीनगर येथून रवाना होण्यापूर्वी या पर्यटकांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला आणि सुरक्षित प्रवासासाठी या सर्वांना आश्वस्त करून निरोप दिला, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. तसेच जम्मू काश्मीरमध्ये असलेल्या पर्यटकांच्या सुरक्षिततेबाबत जम्मू काश्मीरचे उपमुख्यमंत्री सुरींदर कुमार चौधरी यांची भेट घेऊन चर्चा केली. पर्यटकांना त्यांच्या राज्यात सुखरूप परत पाठवण्यास सरकारचे प्राधान्य असून त्यासाठी संपूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली, अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली.

## काश्मीरमध्ये चकमकीत जवान शहीद

**उधमपूर, दि. २४ वृत्तसंस्था**

जम्मू-कश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यातील डुडू-बसंतगड परिसरात सुरक्षादल आणि दहशतवाद्यांमध्ये मोठी चकमक सुरू आहे. या चकमकीत भारतीय लष्कराचा एक जवान शहीद झाल्याची माहिती मिळत आहे. परिसरात अजूनही गोळीबार सुरू आहे.



पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू-कश्मीरमध्ये सुरक्षा दलाने दहशतवाद्यांविरुद्ध मोठी शोध मोहीम सुरू आहे. जम्मू-कश्मीर पोलिस आणि लष्कराकडून संयुक्तपणे डुडू-बसंतगड भागात ही शोधमोहीम सुरू आहे. यादरम्यान, दहशतवाद्यांनी सुरक्षादलांवर गोळीबार केला, ज्याला जवानांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. यात एक जवान शहीद झाला आहे.

व्हाइट नाईट कोरच्या सोशल मीडिया पोस्टनुसार, "गोपनीय माहितीच्या आधारे उधमपूरच्या बसंतगड परिसरात शोधमोहीम राबवण्यात आली. मोहिमेदरम्यान सुरक्षादलांना दहशतवाद्यांशी संपर्क आला आणि जोरदार गोळीबार सुरू झाला. यावेळी लष्कराचा एक जवान गंभीर जखमी झाला. वैद्यकीय उपचार सुरू असताना तो शहीद झाला."

मंगळवारी जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार करून २६ जणांची निर्घृण हत्या केली. लष्कराच्या गणवेशात आलेल्या दहशतवाद्यांनी पहलगामच्या बैसरन व्हॅलीमध्ये पर्यटकांना त्यांच्या धर्माबद्दल विचारले, त्यांची ओळखपत्रे तपासली आणि नंतर ते हिंदू असल्याचे सांगत त्यांना गोळ्या घालून ठार मारले. २६ मृतांपैकी बहुतेक पर्यटक आहेत, तर दोन परदेशी आणि दोन स्थानिक नागरिक आहेत.

## पाकिस्तानी नागरिकांनी ४८ तासांत भारत न सोडल्यास कारवाई होणार

**नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून २६ पर्यटकांचा बळी घेतल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त होत आहे. तसेच केंद्र सरकारनेही या दहशतवाद्यांना पाठबळ देणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी मुत्सद्देगिरीच्या पातळीवर काही निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये सध्या भारतात वास्तव्य करून असलेल्या नागरिकांना ४८ तासांमध्ये देश सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यावरून सुरक्षा यंत्रणा आणि गुप्तचर यंत्रणांना सतर्कतेचे आदेश देण्यात आले आहेत.

सरकारच्या इमिग्रेशन विभागाकडून भारतात वास्तव्य करून असलेल्या सर्व पाकिस्तानी नागरिकांची माहिती मागवण्यात आली आहे. ४८ तासांच्या मुदतीनंतर भारतात राहिलेल्या पाकिस्तानी नागरिकांना पकडून माघारी पाठवण्याची कारवाई सुरू होईल. पाकिस्तानी नागरिकांना माघारी धाडण्यासाठी उच्चस्तरीय बैठक सुरू आहे. त्यामध्ये काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जातील. केंद्र सरकारच्या



आदेशांनुसार गुप्तचर आणि सुरक्षा यंत्रणा पुढच्या ४८ तासांपर्यंत भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांवर लक्ष ठेवतील.

या संदर्भात अधिक माहिती देताना एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, सध्या भारतात किती पाकिस्तानी नागरिक आहेत आणि ते कुठे आहेत, याबाबत इमिग्रेशन आणि परदेशी नागरिकांची नोंदणी करणाऱ्या कार्यालयांकडे विचारणा करण्यात आली आहे. नियमांनुसार पाकिस्तानी नागरिकांना अटारी बॉर्डर, रेल्वे स्टेशन आणि विमान तळांवरील इमिग्रेशन अधिकाऱ्यांकडे आपली माहिती नोंदवावी लागेल. त्यामध्ये त्यांचं वास्तव्य असलेला पत्ताही द्यावा लागेल. सर्व इमिग्रेशन कार्यालये आज संध्याकाळपर्यंत आपला अहवाल सरकारकडे सोपवतील. त्यामध्ये किती नागरिक भारतामध्ये आहेत आणि किती माघारी परतले आहेत, याची माहिती दिली जाईल.

४८ तासांची मुदत ओलांडल्यानंतरही भारतात वास्तव्य करून राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना ताब्यात घेण्याचे आदेश त्यांचं वास्तव्य असलेल्या भागातील स्थानिक पोलिसांना दिले जातील. पोलीस या नागरिकांना ताब्यात घेऊन बसच्या माध्यमातून अटारी बॉर्डरवरून पाकिस्तानमध्ये पाठवतील. विशेष परिस्थितीत या नागरिकांना अटक करण्याची तरतूद आहे. मात्र सामान्य परिस्थितीत या अधिकाराचा वापर केला जाणार नाही.

या अधिकाऱ्याने सांगितले की, वैध कागदपत्रांसह भारतात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांची इत्यंभूत माहिती केंद्र सरकारकडे आहे. सरकारी आदेशानुसार या नागरिकांना कोणत्याही परिस्थितीत भारत सोडावा लागेल. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने हे पाऊल उचलले आहे.

## अमित शाहा आणि परराष्ट्रमंत्री जयशंकर राष्ट्रपतींच्या भेटीला



**नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. बुधवारी सरकारने पाकिस्तानविरुद्ध पाच मोठे निर्णय घेतल्यानंतर, आता आज परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि गृहमंत्री अमित शाहा, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना भेटण्यासाठी पोहोचले. सुरक्षा परिस्थितीचे गांभीर्य आणि भविष्यातील रणनीतींवर चर्चा करण्याच्या दृष्टीने ही उच्चस्तरीय बैठक महत्त्वाची मानली जाते. यासोबतच, परराष्ट्र मंत्रालयात एक महत्त्वाची बैठकही झाली. ज्यामध्ये अनेक देशांच्या राजदूतांना बोलावण्यात आले. जर्मनी, जपान, पोलंड, ब्रिटन आणि रशियासह अनेक देशांचे राजदूत परराष्ट्र मंत्रालयाच्या कार्यालयात पोहोचले. या राजदूतांना पहलगाम दहशतवादी हल्ल्याची सविस्तर माहिती देण्यात आली असून, भारताच्या सुरक्षाविषयक चिंतांबद्दल जाणीव करून देण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, परराष्ट्र मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी त्यांना हल्ल्यामागील संभाव्य दहशतवादी संघटना, पाकिस्तानची भूमिका आणि सुरक्षा एजन्सींनी केलेल्या कारवाईबद्दल माहिती देण्यात आली. दरम्यान, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी शुक्रवारी स्वतः परिस्थितीचा आढावा घेतील आणि बैसरनमधील हल्ल्याच्या ठिकाणाला भेट देतील. ते लष्करी कमांडर आणि स्थानिक अधिकाऱ्यांसोबत तेथील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेऊन भविष्यातील रणनीती ठरवतील. लष्कराच्या या पावलाला दहशतवादाविरुद्ध निर्णायक कारवाईसाठी एक मजबूत संकेत मानले जात आहे.

## चुकून सीमा ओलांडून पाकिस्तानात पोहोचला बीएसएफ जवान

**फिरोजपूर, दि. २४ वृत्तसंस्था**

जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाल्यानंतर आता सीमेवर मोठी घडना घडली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव असताना सीमेवर, सीमा सुरक्षा बलाचा एक सैनिक सीमा ओलांडून पाकिस्तानात पोहोचला. ही घटना फिरोजपूरमधील भारत-पाकिस्तान सीमेवर घडली. बीएसएफ जवानाने चुकून झिरो लाईन ओलांडली. यानंतर पाकिस्तानी रेंजर्सनी त्याला ताब्यात घेतले आहे.

पंजाबमधील फिरोजपूर जिल्ह्यातील पाकिस्तानच्या आंतरराष्ट्रीय सीमेवर झिरो लाईनवर हा प्रकार घडला. बुधवारी चुकून पाकिस्तानात घुसलेल्या सीमा सुरक्षा दलाच्या जवानाला पाक रेंजर्सनी ताब्यात घेतले आहे. रात्री उशिरा बीएसएफ आणि पाक रेंजर्समध्ये झालेल्या बैठकीत बीएसएफने आपल्या सैनिकाला परत पाठवण्याची मागणी केली. पण पाक रेंजर्सनी ती नाकारली आहे. या मुद्द्यावरून आज पुन्हा बीएसएफ आणि पाक रेंजर्समध्ये महत्त्वाची बैठक होणार आहे. पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानबाबत घेतलेल्या निर्णयांनंतर ही धक्कादायक घडना



घडल्याचे समोर आले आहे.

सीमा ओलांडून पाकिस्तानात गेलेला बीएसएफ जवान हा त्या तुकडीमध्ये आहे ती काही दिवसांपूर्वीच तिथे तैनात करण्यात आली आहे. सीमा रेषा ओळखता न आल्याने बीएसएफ जवान चुकून पाकिस्तानात गेला आहे. बीएसएफ जवान काटेरी तारेच्या पलीकडे असलेल्या नो मॅन्स लँडमध्ये पिक कापणाऱ्या शेतकऱ्यांवर लक्ष ठेवत होता. त्याचदरम्यान, पाक रेंजर्सनी त्याला ताब्यात घेतले. झिरो लाईनच्या खूप आधी काटेरी तार बसवली जाते. झिरो लाईनवर फक्त खांब बसवले जातात.

बीएएसएफ जवान झिरो लाईन ओलांडून पाकिस्तानच्या सीमेवर झाडाच्या सावलीत बसण्यासाठी गेला. दरम्यान, पाकिस्तानी रेंजर्सनी त्याला पाहिले. तो बीएसएफ चेकपोस्टवर पोहोचला आणि सैनिकाला ताब्यात घेतले आणि त्याचे शस्त्र जप्त केले. तथापि, बीएसएफचे अधिकारी सीमेवर पोहोचले आहेत आणि सैनिकाची सुटका करण्यासाठी सीमेवर रात्री उशिरापर्यंत बैठक सुरु घेतली.

बुधवारी सकाळी, शेतकरी कुंपणावरील गेट क्रमांक २०८/१ मधून शेतातून गहू काढण्यासाठी गेले होते. शेतकऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी त्यांच्यासोबत दोन बीएसएफ जवानही गेले होते. त्याचवेळी सैनिकाने चुकून सीमा ओलांडली. कडक ऊन असल्याने बीएसएफ जवान झिरो लाईन ओलांडून पाकिस्तानच्या सीमेत जाऊन एका झाडाच्या सावलीत बसला. त्याचवेळी पाकिस्तानी रेंजर्सनी त्याला पाहिले आणि त्यांनी चेकपोस्टवर पोहोचत त्याला ताब्यात घेतले आणि त्याचे शस्त्र जप्त केले. त्यानंतर लगेचच बीएसएफचे अधिकारी लगेचच सीमेवर पोहोचले.

## छत्तीसगडमध्ये मोठी कारवाई, 5 नक्षली ठार

**बिजापूर, दि. २४ प्रतिनिधी**

छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्याच्या कॅरेगुट्टा जंगल भागात मोठी नक्षलविरोधी कारवाई सुरु आहे. या कारवाईत ५ नक्षलवादी ठार झाले आहेत. देशातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या नक्षलविरोधी कारवाई मानली जात आहे. कारण यात छत्तीसगड, तेलंगणा आणि महाराष्ट्रातील २० हजार सुरक्षा कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे. त्यांनी बिजापूर जिल्ह्यातील कॅरेगुट्टा जंगल भागात सुमारे १ हजार नक्षलवाद्यांना घेरले असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.

ही कारवाई सुमारे ४८ तास सुरू आहे. मोस्ट वॉन्टेड कमांडर हिडमा आणि बटालियन प्रमुख देवा यांच्यासह प्रमुख नक्षलवादी नेत्यांच्या हालचालीबद्दल गुप्त माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई सुरू करण्यात आली.

जिल्हा राखीव रक्षक दल, बस्तर फायटर्स, विशेष टास्क फोर्स , राज्य पोलिसांच्या सर्व तुकड्या, केंद्रीय राखीव पोलिस दल आणि त्यांच्या कमांडो बटालियन फॉर रिझोल्यूट ॲक्शन यांच्यासह विविध तुकड्यांतील सुरक्षा कर्मचारी या कारवाईत सहभागी झाले आहेत.

नक्षलवाद्यांच्या पलायनाचे सर्व मार्ग बंद करण्यासाठी सुरक्षा दलांनी संवेदनशील छत्तीसगड-तेलंगणा सीमेवरील कर्रेगुट्टा भागाला घेरले आहे. घनदाट जंगल आणि टेकड्यांनी वेढलेला हा परिसर माओवाद्यांच्या बटालियन क्रमांक १ चा अड्डा मानला जातो.

काही दिवसांपूर्वी नक्षलवाद्यांनी एक प्रसिद्धी पत्रक जारी केले होते. त्यातून त्यांनी ग्रामस्थांना डोंगरात प्रवेश न करण्याचा इशारा दिला होता. या भागात मोठ्या प्रमाणात आयईडी पेरण्यात आले असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले होते.

३१ मार्च २०२६ पूर्वी देशातून नक्षलवाद पूर्णपणे संपवू, असा इशारा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिला होता. ही घटना अशावेळी घडली आहे जेव्हा केंद्र सरकारने देशाला 'नक्षलमुक्त' करण्याचे ठरवले आहे. "३१ मार्च २०२६ पूर्वी आम्ही देशातून नक्षलवाद पूर्णतः नष्ट करू, जेणेकरून देशातील कोणत्याही नागरिकाला नक्षल्यांमुळे आपला जीव गमवावा लागू नये," असे अमित शाह यांनी फेब्रुवारीमध्ये सांगितले होते.

यावर्षी छत्तीसगडमधील विविध चकमकींत आतापर्यंत जवळपास १५० नक्षलवाद्यांना मारण्यात आले आहे. त्यात बस्तरमधील १२४ नक्षल्यांचा समावेश आहे. केंद्रानेदेखील झारखंडमध्ये नक्षलवाद्यांवर कारवाई केली. गेल्या आठवड्यात झारखंडमधील बोकारो जिल्ह्यात सीआरपीएफचे कोब्रा कमांडो आणि नक्षलवादी यांच्यात चकमक झाली. या चकमकीत ८ नक्षलवादी ठार झाले. त्यात एक कोटी रुपयांचे बक्षीस असलेल्या एका वरिष्ठ नक्षली नेत्याचा समावेश होता.

# भ्याड हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना कठोर शिक्षा व्हावी : छगन भुजबळ



**मुंबई ।** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्यात देशातील २७ पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही अतिशय धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना आहे. या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या पर्यटकांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत तीव्र निषेध व्यक्त केला आहे. तसेच हा भ्याड हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना पकडून त्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्यानंतर माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी श्रद्धांजली अर्पण करत या घटनेचा तीव्र निषेध केला आहे. यावर त्यांनी एका व्हिडीओद्वारे आपल्या भावना व्यक्त केल्या आहे. यामध्ये म्हटले आहे की,जम्मू काश्मीर मधील पहलगाम येते झालेल्या दहशतवादी हल्ल्यात देशातील २७ पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने अतिशय धक्का बसला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करतो. पुढे ते म्हणाले,हा भ्याड हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना अतिशय कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे. यादृष्टीने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृह मंत्री अमित शहा स्वतः लक्ष घालत असून त्यांना त्यात यश मिळेल. या घटनेत पर्यटकांना मारताना ते मुसलमान नाहीत याची खात्री करून मारण्यात आले आहे. ही अतिशय संतापजनक बाब असून हा हल्ला म्हणजे आपल्या संपूर्ण देशावर झालेला हल्ला आहे. मुंबई तसेच अक्षरधाम मध्ये झालेल्या हल्ल्याप्रमाणे हा मोठा हल्ला असून तीव्र निषेध करावा असा हा हल्ला असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी पुढे म्हटले आहे की, केंद्र आणि तेथील स्थानिक राज्यसरकारकडून काश्मिरी नागरिकांच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण अशा सुधारणा करण्यात येत आहे. या होणाऱ्या सुधारणा पाकिस्थानी दहशतवाद्यांना पाहवत नसल्याने त्यांनी हा हल्ला केल्याचे दिसते आहे. या दहशत वाद्यांना काश्मीरचा विकास नको आहे. त्यांना याठिकाणी दहशत निर्माण करून संपूर्ण जगात याबाबत चुकीचा गैरसमज पसरविण्याचा तसेच देशातील हिंदू मुस्लीम नागरिकांमध्ये द्वेष निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. याबाबत मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी देखील तीव्र निषेध व्यक्त केला आहे.या घटनेबाबत देशातील मुस्लीम नेत्यांनी देखील या घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करून जे मारले गेले ते आमचे हिंदुस्थानी बंधू आहे हा हल्ला आम्ही कदापीही सहन करू शकत नाही हे म्हटले आहे. त्यातून देशाची एकता जगासमोर येईल आणि दहशतवाद्यांना देखील चपराक बसेल. भारत सरकार याकडे लक्ष देत असून यावर कारवाई करतीलच. या घटनेनंतर देशातील सर्व नागरिकांची जबाबदारी आहे की, देशातील सामाजिक सलोखा बिघडणार नाही. कुठेही दंगे तसेच अनुचित प्रकार होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. परकीय शक्तींना हाणून पडण्यासाठी आपल्याला एकसंघ राहावे लागेल.

# हास्याचा आरोग्यावर चांगला परिणाम : डॉ. सोनाली देवगांवकर



**नाशिक ।** दैनंदिन हास्य क्लब मध्ये जाऊन निखळ हासणे याचा आरोग्यावर चांगला परिणाम होत असुन महिलांनी कामकाज सांभाळून आरोग्याबाबत सावधानता बाळगायला हवी असे प्रतिपादन देवगावकर हॉस्पिटलच्या स्त्रीरोग तज्ञ डॉ सोनाली देवगावकर यांनी केले. पाटील गार्डन येथील हास्य क्लब मध्ये मॉर्निंग टिप्स देताना डॉ सोनाली देवगावकर बोलत होत्या.

यावेळी संजय सोनार,अशोक सावकार, ज्योतीताई येवले,आर आर वाणी, जी. जी. बोरसे, रिजवाना शेख यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. डॉ.देवगावकर म्हणाल्या की, पौगंडावस्था, पीसीओडी वंध्यत्व, रजोनिवृत्ती, मेनोपोज व स्त्रियांमध्ये वारंवार होणारे लघवीचे इन्फेक्शन यासारख्या अनेक महत्त्वांच्या विषयांवर मार्गदर्शन केले. येथे उपस्थित महिलांच्या समस्या समजावून घेऊन त्यांना समाधानकारक पर्याय सांगितले. आरोग्य हीच खरी संपत्ती असल्याचे सांगून त्यांनी महिलांना स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देऊन वेळोवेळी तपासण्या करण्यास सांगितले. तसेच आरोग्यपूर्ण जीवनशैली जगण्याची पहिली पायरी म्हणजे रात्री वेळेत झोपून सकाळी लवकर उठणे हे आहे. हल्ली फोन, टीव्ही, पार्टीज अशा कारणांनी रात्री उशिरा झोपण्याची सवय लोकांना लागली आहे. त्यामुळे सकाळी उशीरा उठतात. पण आपली उर्जा लेव्हल सकाळी सर्वाधिक असते. त्यामुळे ती झोपण्यात वाया न घालवता ती वापरावी. यासाठी पाहटे उठणं सर्वोत्तम समजलं जातं. त्यामुळे शरीरात उत्साह आणि सकारात्मकता जाणवते. सकाळी लवकर उठून व्यायम केल्याने शरीर आणि मन दोन्हीही तंदुरूस्त राहते. त्यामुळे उत्साह जाणवतो. आणि तुम्ही हेल्दी आणि आनंदी राहू शकतात. यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## ➤ महत्त्वाचे

### परिस्थितीतूनच सापडतात जगण्याच्या वाटा : प्रा. डॉ. पाटील

**नाशिक ।** प्रत्येकाचे आयुष्य हे सुख आणि दुःख यातून घडत असतं. प्रत्येक माणसाला जगण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावाच लागतो. तेव्हाच जगण्याच्या




वाटा सापडतात, असे प्रतिपादन प्रा.डॉ.सुरेश पाटील यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात 'पुस्तकावर बोलू काही' उपक्रमात 'हिवर' या पुस्तकावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक अलका दराडे होत्या.

डॉ.पाटील म्हणाले की, जग खूप सुंदर आहे. ते सुंदर बनवण्यासाठी आपण कष्ट करण्याची जिद्द ठेवली तर निश्चितच ते अधिक समृद्ध करण्याचं बळ आपल्याला मिळतं. हिवर या झाडाला काटे असले तरी त्या काट्यातून हे झाड स्वतःचा बचाव करत जगण्याची लढाई करत असते. म्हणूनच प्रत्येक माणसाचे आयुष्य हे हिवर या झाडासारखे असते. त्यातून मार्ग काढत जबाबदाऱ्या डोळ्यासमोर ठेवल्या तर माणसाचे आयुष्य समृद्ध झाल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी संघर्ष या शब्दाची आपण बांधिलकी ठेवणे गरजेचे आहे. ज्या भूमीत आपण जन्माला आलो; त्या भूमीचे ऋणही आपल्यावर असते, असेही ते म्हणाले. दादा पठाडे आणि अशोक भदाणे या भाग्यवान विजेत्यांना ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात आले. मधुकर गिरी यांनी सूत्रसंचालन केले तर संजय आहेर यांनी आभार मानले. दरम्यान शुक्रवारी (दि.२५) ज्येष्ठ पत्रकार मुकुंद बाविस्कर हे 'तुकडोजी महाराज' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

### बंदी असूनही विंचूरला गुटखा विक्री सर्रास सुरूच

**विंचूर ।** गुटखाबंदी कायदा हा तंबाखूजन्य



पदार्थांच्या वापरास आणि विक्रीस प्रतिबंध करतो. या कायद्याअंतर्गत गुटखा, पान मसाला, सुगंधी तंबाखू आणि इतर तत्सम पदार्थांच्या उत्पादनावर, वाहतुकीवर, साठवणुकीवर आणि विक्रीवर बंदी असतांना विंचूरमध्ये मोठ्या प्रमाणात गुटखा विक्री सुरू असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. विंचूरसह विंचूर परिसरात मोठ्या प्रमाणात गुटखा विक्री होत आहे. गुटखा विक्रेता कोणालाही न घाबरता गुटखा विक्री करीत आहे. कर्नाटक व गुजरात या परराज्यातून मोठ्या प्रमाणात गुटखा खरेदी करून तो जळगाव मार्गे विंचूरला आणला जातो. निफाड तालुक्यात गुटखाविक्री करण्याचे प्रमाण वाढले आहे; परंतु चोरट्या वाहतुकीद्वारे महाराष्ट्रात गुटखा येतो आणि त्याची सर्रासपणे विक्री होत आहे. गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्रात गुटखाबंदी आहे. परंतु ती कागदावरच आहे. प्रत्यक्षात गुटखा सर्रासपणे विक्री सुरू आहे. निफाड तालुक्यात, पोलीस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री यांनी धाडसत्र सुरु केले आहे; परंतु विंचूरला गुटखा विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यावर नेमकं कोणाचा वरदहस्त आहे. निफाड तालुक्यात गुटखा विक्रेत्या विरुद्ध आत्तापर्यंत एक-दोन साधी कारवाई करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसापासून हा व्यवसाय सुरू आहे. अनेक वेळा परिसरातील गुटख्याचा व्यवसाय बंद करा, अशी परिसरातील लोकांची मागणी आहे.

### मनमाड परिसरात दरगुडे वस्तीलगत बिबट्याची दहशत

**नांदगाव ।** नांदगाव तालुक्यातील मनमाड येथील सरस्वती शाळेकडे जाणारा रस्ता दरगुडे मळा काखंडी यांच्या इंग्लिश मीडियम स्कूलजवळ



साधारणतः आठ ते साडेआठ वाजेच्या सुमारास बिबट्या आढळून आला. माजी नगराध्यक्ष साईनाथ गिडगे यांचा चालक नितीन कांगणे हे हायवा गाडी घेऊन जात असताना त्यांना बिबट्या दृष्टीस पडला. धरणाच्या दिशेने पळताना बिबट्या आढळून आला. त्यामुळे वागदर्डी, मनमाड परिसरातील नागरिकांनी रात्री अपरात्री वेळेस शेतात जाताना किंवा बाहेर जाताना काळजी घ्यावी. मळ्यातील शेतकरी बांधवांनी आपल्या जनावरांची काळजी घ्यावी. शक्यतो गोठ्याच्या आत बंद दरवाज्यात ठेवावे. रात्री घराच्या बाहेर निघताना बॅटरीचा वापर करावा किंवा टाळावे. प्रशासनाने या गोष्टीची दखल घेऊन लवकरात लवकर पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा अन्यथा दुर्घटनेस सामोरे जावे लागेल. या परिसरात शहरातील सर्वत्र भीतीचे वातावरण पसरलेले आहे. अधिकार संघटना नाशिक जिल्हा अध्यक्ष भागवत झाल्टे यांनी याबाबत नागरिकांना आवाहन केले आहे.

# एमव्हीपी टॅलेंट सर्च स्पर्धा परीक्षेत ३३ विद्यार्थी गुणवत्ता यादीत



## वाघ गुरुजी बाल शिक्षण मंदिरमध्ये बक्षीस

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या वतीने आयोजित 'एमव्हीपी टॅलेंट सर्च स्पर्धा परीक्षा २०२४-२५'मध्ये वाघ गुरुजी बाल शिक्षण मंदिर शाळेतील ३३ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मविप्र संस्थेचे संचालक अॅड. लक्ष्मण लांडगे, स्कूल कमिटीचे अध्यक्ष दत्तात्रेय कोशिरे, सदस्य हिरामण सोनवणे, छबू पवार, मंगल हिरे, मनीषा अहिरराव आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपशिक्षक वैभव पिंगळे यांनी ईशस्तवन व स्वागत गीत सादर केले.

मुख्याध्यापिका पुष्पा लांडगे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर मुख्याध्यापिका लांडगे यांनी विद्यार्थ्यांना प्रास्ताविकातून स्पर्धा परीक्षेचे महत्त्व सांगितले. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत्त विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. संचालक अॅड. लक्ष्मण लांडगे व स्कूल कमिटीचे अध्यक्ष दत्तात्रेय कोशिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ज्येष्ठशिक्षिका पौर्णिमा पगार यांनी सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ शिक्षिका कल्पना पाटील यांनी आभार मानले.

# तोंडवळ ग्रामपंचायतीचा पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत स्थानिक प्रशासनाला सूचना

**नाशिक ।** जिल्ह्यात पेठ तालुक्यातील ग्रामपंचायत तोंडवळ या ठिकाणी पाणी टंचाई निर्माण झाल्याने गावातील सार्वजनिक विहिरीच्या छायाचित्रणासह पाणी टंचाईबाबतची बातमी माध्यमांवर प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने तहसीदार पेठ व गट विकास अधिकारी पेठ यांनी मौजे तोंडवळ गावी भेट देवून पाणी टंचाई बाबत प्रत्यक्ष पाहणी केली असता खालील वस्तुस्थिती निदर्शनास आली आहे.

ग्रामपंचायत तोंडवळ पैकी तोंडवळ या पाडयाची लोकसंख्या ५४३ इतकी आहे. तोंडवळ गावाच्या मध्यभागी ग्रामपंचायत कार्यालयासमोर पाण्यासाठी वापरात असलेली विहीर आहे. या विहीरीपासून १ कि.मी. अंतरावर जलजीवन मिशन अंतर्गत सार्वजनिक पाणीपुरवठा करणारी दुसरी विहीर असून सदर विहीरीतून गावातील जनतेस नळाव्दारे पाणीपुरवठा केला जातो; परंतु आठ दिवसांपूर्वी पाणीपुरवठा करणाऱ्या पाईप लाईनची विद्युत मोटार जळाल्यामुळे पाणी पुरवठा करण्यास अडथळा निर्माण झाला आहे. तथापी गावातील सार्वजनिक विहिरीमध्ये ग्रामपंचायततर्फे दररोज दोन टँकरव्दारे अंदाजे १० हजार लिटर पाणी विहीरीमध्ये सोडले जाते. सदरचे पाणी पिण्यासाठी व सुमारे गावात सुरु असलेल्या ६७ घरकुलांच्या बांधकामासाठी पाण्याचा वापर केला जातो असे पाहणी दरम्यान निदर्शनास आले आहे. सबब स्थानिक नळ पाणीपुरवठा करण्यात येणारी इलेक्ट्रीक मोटर नादुरुस्त झाल्याने अल्प कालावधीकरीता पाणी पुरवठा विस्कळीत झाला होता. तरी तहसिलदार पेठ व गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचयात प्रशासनास जल जीवन मिशनव्दारे उपलब्ध असलेले पाणी हे फक्त पिण्याचे पाणी म्हणून उपयोगत आणणेबाबत सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत. गावी जलजीवन मिशन अंतर्गत गावातील सर्व कुटूंबाना सुरळीत पाणी पुरवठा असल्यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष सदृश्य परिस्थिती नाही. तथापि टँकरव्दारे सार्वजनिक विहीरीमध्ये पाणीपुरवठा होत असल्याने पिण्याचे पाण्याची टंचाई नाही, तरी ग्रामपंचायत तर्फे जलजीवनाची नवीन इलेक्ट्रीक मोटार बसवून तात्काळ नळाव्दारे सुरळीतपणे पाणी पुरवठा सुरु करणार आहे असे कळविलेले आहे. मौजे तोंडवळ ग्रामपंचायत मार्फत पाणीपुरवठा करण्याची इलेक्ट्रीक मोटार तात्काळ दुरुस्त करुन घेऊन गावी सुरळीत पाणीपुरवठा होईल याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे स्थानिक प्रशासनाला देण्यात आले असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांनी पत्रकान्वये कळविले आहे.

# श्रमिक बहुउद्देशीय संस्था व यश क्लासेसतर्फे अंधअपंग मुलांच्या मातांचा 'नारीरत्न' पुरस्काराने सन्मान





**नाशिक ।** इथे ना फक्त पुरस्कार वाटले, तर प्रेरणा पेरली गेली! अंध, अपंग व मतिमंद असलेल्या मुलांच्या सामर्थ्यवान मातांना आणि त्यांच्यासोबत सामाजिक कार्यात झोकून देणाऱ्या शिक्षिका, केअरटेकर यांना मिळालेल्या 'नारीरत्न पुरस्कारांनी'! निमित्त होते सामाजिक बहुउद्देशीय संस्था व यश क्लासेसच्या संचालिका वैशाली सपकाळे यांच्या जन्मदिवसाचे! या आगळ्यावेगळ्या उपक्रमाने वातावरणात एक स्फूर्तिदायी जिवंतपणा भरला होता.

'अशक्याला शक्य करणाऱ्या' मातांचा संघर्ष, या विशेष बालकांचे संगोपन करून त्यांचं आयुष्य घडवणाऱ्या या मातेचं सामर्थ्य या सन्मानाचा केंद्रबिंदू होता. सामाजिक जाणीवांनी भारलेल्या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून मनपाचे माजी स्थायी समिती सभापती गणेश गिते, डॉ. भाग्येश मंत्री, रील्स स्टार साहील अन्सारी आणि खाजगी कोचिंग क्लासेस संघटनाचे उपाध्यक्ष किशोर सपकाळे, खजिनदार रविंद्र पाटील हे होते.या कार्यक्रमाचं यशस्वी आयोजन श्रमिक बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष वैशाली सपकाळे व 'यश क्लासेस'चे संस्थापक अध्यक्ष किशोर सपकाळे यांनी केले. चैत्राली परांजपे, नुपूर सपकाळे आणि मैथीली सपकाळे या विद्यार्थिनींनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. सोहळ्याचे सूत्रसंचालन सुषमा परांजपे यांनी केले.

# निफाडला मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**निफाड ।** एस.एम.बी.टी. हॉस्पिटल आणि छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त जय हिंद लोकचळवळ निफाड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवलला. विविध प्रकारच्या आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. या उपक्रमात सामान्य नागरिकांना मोफत सेवा उपलब्ध करून देण्यात आली, ज्यामुळे अनेक गरजू रुग्णांना त्वरित तपासणी व सल्ला मिळाला. उत्सव समितीचे अध्यक्ष सचिन खडताळे यांनी याप्रसंगी माहिती देताना सांगितले की, सामाजिक बांधिलकीतून आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, यामधून गरजूंपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जय हिंद लोकचळवळ, उत्सव समिती सदस्य, वैद्यकीय कर्मचारी, स्वयंसेवकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# 'देवमाणूस' भावनांनी भरलेला, थरारक अनुभव लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

**नाशिक ।** लव रंजन आणि अंकुर गर्ग यांच्या लव फिल्म्सची निर्मिती असलेला आणि तेजस प्रभा विजय देऊस्कर दिग्दर्शित 'देवमाणूस' हा बहुप्रतिक्षित मराठी चित्रपट २५ एप्रिल २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. हा चित्रपट लव फिल्म्सच्या मराठी सिनेसृष्टीतील प्रवासाची सुरुवात अधोरेखित करणारा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

'देवमाणूस' मध्ये महेश मांजरेकर, रेणुका शहाणे, सुबोध भावे, सिद्धार्थ बोडके यांसारख्या ताकदीच्या कलाकारांच्या प्रमुख भूमिका असून त्यांच्या अभिनयामुळे चित्रपटाची कथा अधिक प्रभावीपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून ट्रेलरला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. भावनिक, रहस्यपूर्ण आणि गूढ यांचा मेळ असलेला एक संस्मरणीय सिनेमॅटिक अनुभव देणारा चित्रपट आहे. दमदार कथानक, उत्कंठा वाढवणारे प्रसंग आणि मनाला भिडणारे संगीत यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांना कथेशी जोडून ठेवेल. चित्रपटातील दोन खास गाणी देखील सध्या प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरत आहेत. सोनू निगम यांच्या आवाजातील 'पांडुरंग' हे हृदयस्पर्शी भक्तिगीत, रोहन-रोहन यांचे संगीत आणि प्रसाद मडूपवार यांचे गीत असलेले हे गाणं श्रद्धा आणि भक्तीचा सुरेल संगम आहे. महेश मांजरेकर यांच्या वारी यात्रेतील भावनिक दृश्यांनी परिपूर्ण हे गाणे आध्यात्मिक आणि भावनिक दृष्टिकोनातून प्रेक्षकांवर प्रभाव टाकणारे आहे. तर दुसरे गाणे 'आलेच मी' या लावणीमध्ये, सई ताम्हणकर पहिल्यांदाच लावणीवर थिरकताना दिसत आहे. तेजस देऊस्कर लिखित या गाण्याला रोहन-रोहन यांनी संगीत दिले असून बेला



शेंडे आणि रोहन प्रधान यांच्या आवाजात ते सादर झाले आहे. सुप्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक आशीष पाटील यांच्या संकल्पनेत साकारलेली ही लावणी प्रेक्षकांना उत्साह आणि सौंदर्याचा अनुभव देणारी ठरत आहे.

दिग्दर्शक तेजस प्रभा विजय देऊस्कर म्हणतात, हा माझ्यासाठी केवळ एक चित्रपट नसून एक भावनिक प्रवास आहे. लव फिल्म्सने माझ्यावर ठेवलेला विश्वास आणि संपूर्ण टीमची मेहनत यामुळे हे स्वप्न प्रत्यक्षात उतरले. ट्रेलरला मिळालेला प्रेक्षकांचा प्रतिसाद पाहाता प्रेक्षक या चित्रपटासाठी उत्सुक असल्याचे दिसतेय. प्रेक्षकांना हा चित्रपट नक्कीच आवडेल याची मला खात्री आहे." निर्माते लव रंजन म्हणतात, हा चित्रपट म्हणजे महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीला आमची आदरांजली आहे. केवळ आमचा मराठी चित्रपटसृष्टीतील प्रवेश नाही, तर दर्जेदार आणि अर्थपूर्ण कथानक सादर करण्याचा संकल्प आहे. निर्माते अंकुर गर्ग यांचा विश्वास आहे की, "तेजस देऊस्कर यांचे प्रभावी दिग्दर्शन आणि कलाकारांची सशक्त कामगिरी 'देवमाणूस'ला एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जाईल. आम्हाला या चित्रपटाचा भाग असल्याचा अभिमान आहे."

## महत्त्वाचे

### नाशिकमधील प्रश्नांबाबत मंत्रालयातील बैठक बारगळली

**नाशिक ।** नाशिक शहरासह पश्चिम विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांसह ५५ कोटी रुपयांच्या भूसंपादन संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे बोलावण्यात आलेली बैठक बारगळली आहे. अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ही बैठक रद्द करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. उपमुख्यमंत्री शिंदे हे देखील महाराष्ट्रातील पर्यटकांच्या मदतीला गेल्याने ही बैठक रद्दबातल करण्यात आली. पुढील आठवड्यात ही बैठक घेण्यात येईल, अशी माहिती आमदार सुमारे यांनी दिली. शहरातील रिक्त पदांची भरती, अतिक्रमण, पार्किंग,, अनियमित पाणीपुरवठा, साधुग्राम भूसंपादन, आयटी व लॉजिस्टिक पार्क, सिडकोतील घरे फ्री होल्ड करणे तसेच मागील वर्षी रोख स्वरूपात 55 कोटी रुपयांचे भूसंपादन करण्यात आल्याने या संदर्भातील प्रश्न सोडवणे अशी मागणी आमदार हिरे यांनी केली होती. त्या अनुषंगाने आमदार हिरे यांनी पत्र दिले होते. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे बुधवारी (दि. २३) बैठकीला गिरीश महाजनदेखील उपस्थित राहणार होते; मात्र बैठक रद्द करण्यात आली आहे. पुढच्या आठवड्यात ही बैठक होणार असल्याचे सांगण्यातआले.

### प्रसारासाठी जैन मराठी विश्वकोशाची निर्मिती

**नाशिक ।** जैन समाजाच्या प्राचीन ग्रंथ संपदेचे मराठी भाषेत प्रचार-प्रचारासाठी जैन मराठी विश्वकोशाची निर्मिती करण्यात येणार आहे. पुढील तीन वर्षात हा विश्वकोश तयार होईल, अशी माहिती जैन अल्पसंख्यांक कार्तिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली. जैन समाजातील गरजूंना महामंडळातर्फे शिक्षण, उद्योग, तसेच गृह कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते भगवान महावीर यांच्या जीवन चरित्रावर आधारित निबंध स्पर्धेतील गुणवत्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमानंतर ते प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना बोलत होते. केंद्र सरकारने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिलाय. महामंडळाचे संस्कृत भाषेतील जैन ग्रंथ संपदा मराठी विश्वकोशाच्या माध्यमातून प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. या विश्वकाशाचे निर्मिती सदानंद मोरे व वसंत सोनवणे यांचा सहभाग असेल, असेही गांधी यांनी यावेळी स्पष्ट केले. महामंडळामार्फत समाजाचे संरक्षण करतानाच समाजातील आर्थिक दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. विद्यार्थी ते विद्यार्थ्यांना देश विदेशातील शिक्षणासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल ज्या कुटुंबाकडे स्वतःचे घरही नाही समाज बांधवांना महामंडळ बिनव्याजी करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.

### 'झापुक झुपुक' सिनेमा २५ एप्रिलपासून सर्व चित्रपटगृहांमध्ये!

**नाशिक ।** मराठी चित्रपटसृष्टीत हास्य आणि प्रेमाची नवी लाट घेऊन येणारा बहुप्रतिक्षित "झापुक झुपूक" या चित्रपटाची सर्व प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत होते. आता ती प्रतीक्षा



संपली आहे. केदार शिंदे दिग्दर्शित आणि जिओ स्टुडिओज प्रस्तुत 'झापुक झुपुक' हा सिनेमा २५ एप्रिल २०२५ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. 'झापुक झुपूक' हा चित्रपट प्रेम, मैत्री आणि हास्याने भरलेला आहे. या सिनेमाच्या ट्रेलरला आणि गाण्यांना आतापर्यंत प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. त्यामुळे यात काही शंका नाही कि चित्रपटाला सुद्धा तितकच प्रेम प्रेक्षक देतील. चित्रपटाच्या ट्रेलर लाँचच्या कार्यक्रमात अभिनेता रितेश देशमुख यांनी सुद्धा 'झापुक झुपूक' हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. विशेष म्हणजे या सिनेमाची अॅडव्हान्स बुकिंग सुरू झाली आहे त्यामुळे तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात तिकीट लवकरात लवकर बुक करा आणि 'झापुक झुपूक' चा आनंद घ्या! 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वाचा विजेता सूरज चव्हाण या चित्रपटात प्रमुख भूमिकेत आहे. त्याच्यासोबत जुई भागवत, इंद्रनील कामत, हेमंत फरांदे, पायल जाधव, पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी आणि दीपाली पानसरे यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. जिओ स्टुडिओज् प्रस्तुत, केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित, निर्माती ज्योती देशपांडे, निर्माती सौ. बेला केदार शिंदे ,केदार शिंदे दिग्दर्शित "झापुक झुपूक" या चित्रपटामध्ये सूरज चव्हाणच्या अभिनयाची झलक पाहण्यासाठी आणि केदार शिंदे यांच्या दिग्दर्शनाचा अनुभव घेण्यासाठी प्रेक्षक सज्ज आहेत. 'झापुक झुपूक' हे नाव जितकं गमतीशीर आहे, तितकाच हा चित्रपट प्रेक्षकांना हसवणार, गुंतवणार आणि शेवटी एक उबदार संदेश देऊन जाईल.





# कामे झाले की नाही बघण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांचीच!




**नाशिक ।** सिंचन विभागाकडून करण्यात येत असलेली कामे शंभर टक्के झाली आहे किंवा नाही हे बघण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागाच्या उपअभियत्यांची असते आणि पाच टक्के जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची असते असे असताना कामे झालेली नाही, तरीही पुणेगाव कालव्याची कामे झाल्याचे दाखवून अधिकाऱ्यांनी शासनाच्या डोळ्यात धुळफेक करत आठ कोटी रुपयांची बिल लाटल्याने या विभागाचे कार्यकारी अभियंता आणि उपअभियंता यांच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त केला जात असून या दोघा अधिकाऱ्यांची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

## अधिकाऱ्यांची भामटेगिरी उघड

पुणे गाव कालव्याचे काम झालेले दाखवून अधिकाऱ्यांनी ठेकेदाराशी संगणमत करीत तब्बल आठ कोटी रुपये काढून घेतले आहे. बिला सोबत काम झाल्याचा अहवाल देण्यात आला असून प्रत्यक्षात अनेक गावांमध्ये कामे झाले नसल्याचे 'महासागर' उघडकीस आणले आहे. अधिकाऱ्यांची भामटेगिरी उघड झालेली असताना ते उजळ माथ्याने वावरत असून कामे नियमाप्रमाणे झाल्याचे ते सांगत आहेत. वास्तविक झालेली कामे नियमानुसार पूर्ण झाली आहेत का? हे बघण्याची जबाबदारी उपअभियंता यांची असते तर पाच टक्के जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची असते परंतु कामे झालीच नाहीत तर दोन्ही अधिकाऱ्यांनी कशाचा अहवाल दिला असा सवाल उपस्थित केला जात असून अधिकाऱ्यांची भामटेगिरी उघडकीस आली आहे. कामाच्या पूर्णत्वाची खोटी माहिती देऊन त्यांनी शासनाची फसवणूक केली आहे. त्यामुळे या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांना कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

**सिंचन विभागाशी संबंधित कुठलीही तक्रार असल्यास मो. ८६०५३८४९२५ या नंबरवर संपर्क साधावा.**







# त्र्यंबकेश्वर मंदिरातील लाडू विक्री बंद करण्याचे आदेश

## पुरातत्त्व विभागाचे मंदिर प्रशासनाला पत्र

> प्राचीन स्मारके तथा पुरातत्वीय स्थळे आणि अवशेष अधिनियम १९५८ नियम १९५९ नुसार कुठल्याही वस्तूंची विक्रीची दुकाने तसेच देणगी कार्यालय मंदिरात स्थापन केली जाऊ शकत नाही. अशा बाबींना परवानगी देता येत नाही. **- संतोष महाजन, वरिष्ठ अधिकारी पुरातत्त्व विभाग**

**नाशिक ।** त्र्यंबकेश्वर मंदिरातील बहुचर्चित लाडू विक्री केंद्र बेकायदेशीर असल्याचे ठरवत मंदिराच्या आवारातील लाडू विक्री केंद्र आणि देणगी कार्यालय बंद करण्याची नामुष्की मंदिर प्रशासनावर ओढवली आहे. मुळात किरकोळ रुपयांना मिळणारा लाडू चढ्या भावाने विकला जात असल्याने वादाच्या भोवऱ्यात सापडलेला 'लाडू' पुरातत्त्व विभागाच्या एका आदेशाने गुंडाळून ठेवण्यात आला आहे.त्यामुळे मंदिरातील काही प्रस्थापितांना धक्का बसला आहे तर काहींनी या आदेशाचे स्वागत केले आहे.

देशातील महत्त्वाच्या मंदिरांमध्ये प्रसाद म्हणून लाडू विक्रीची प्रथा असून अशाच पद्धतीने त्र्यंबकेश्वर मंदिरात लाडू विक्री करण्यासाठी काही जणांनी बोगस ठराव करत थेट मंदिराच्या आवारातच लाडू विक्री केंद्र उभारले होते. त्र्यंबकेश्वर मंदिर हे प्राचीन वास्तू असल्याने या संबंधित कुठलाही निर्णय घेण्याअगोदर पुरातत्व विभागाची परवानगी घेणे आवश्यक असते मात्र तसे न करता मंदिर प्रशासनाने बेकायदेशीररित्या लाडू विक्रीस परवानगी दिली होती.सदर प्रसादाचा लाडू बनवण्यासाठी केवळ सात रुपयांचा खर्च येत असताना त्याची चढ्या भावात विक्री होत असल्याचा काहींचा आरोप होता. त्यामुळे लाडू विक्री सुरुवातीपासूनच वादात सापडली होती. लाडू विक्रीच्या आडून भाविकांची लूट होत असल्याचे देखील त्रंबक देवस्थानच्या एका गटाचे म्हणणे होते. त्यामुळे सुरुवातीपासूनच वादाची ठिणगी पडलेली लाडू विक्री बेकायदेशीर ठरवत संबधित लाडू विक्री केंद्र बंद करण्याचे आदेश पुरातत्त्व विभागाने दिले आहे. त्यामुळे ठेकेदारावर मोठी नामुष्की ओढवली असून याला काही पर्याय मिळतो का याची चाचणी सुरू असल्याचे समजते.दरम्यान पुरातत्त्व विभागाच्या या आदेशाचे मंदिरातील एका गटाने स्वागत केले आहे.



# उदोजी होरायझनच्या विद्यार्थ्यांनी अनुभवले 'पोलीस प्रशासन'




## नाशिक पोलीस आयुक्तालयात शैक्षणिक भेट

**नाशिक ।** मविप्र संचलित उदाजी होरायझन स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नाशिक पोलीस आयुक्तालयाला दिलेल्या शैक्षणिक भेटीमध्ये पोलीस प्रशासनाच्या कामकाजाची माहिती जाणून घेतली.


मविप्रचे शिक्षणाधिकारी डॉ. के. एस. शिंदे व मुख्याध्यापिका नेहा सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली या शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी २४ तास कार्यरत असणारे पोलीस दल, पोलिसांची भूमिका आणि जबाबदाऱ्यांची सखोल माहिती विद्यार्थ्यांना मिळावी हा या भेटीचा उद्देश होता. पोलिस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. विद्यार्थ्यांचे स्वागत कक्षाच्या परिचयाने दौऱ्याची सुरुवात केली. त्यानंतर चारित्र्य पडताळणी कक्षामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. नियंत्रण कक्षामध्ये, विद्यार्थ्यांनी शहराची सुरक्षा आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रगत सीसीटीव्ही मॉनिटरिंग सिस्टीमचा आढावा घेतला. ट्रॅफिक कंट्रोल, गुन्हे शोधण्यात रिअल-टाइम पाळत ठेवण्यात कशी मदत करते, हे अधिकाऱ्यांनी सांगितले. नियंत्रण कक्षाला भेट दिल्यानंतर विद्यार्थ्यांना सीपी ऑफिसच्या फेरीवर नेण्यात आले, जिथे त्यांनी पोलिस विभागाच्या दैनंदिन कामकाजाचे आणि प्रशासकीय कर्तव्यांचे निरीक्षण केले. अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्या कामाबद्दल माहिती दिली आणि जिज्ञासू प्रश्नांना उत्साहाने उत्तरे दिली. पोलीस आयुक्त, संदीप कर्णिक यांच्यासोबत आयोजित संवादामध्ये विद्यार्थ्यांनी वाहतूक नियमांवरील पोस्टर्ससाठी केलेल्या सर्जनशील प्रयत्नांची वैयक्तिक त्यांनी प्रशंसा केली. रस्ता सुरक्षा जागरुकता मोहिमेचा एक भाग म्हणून तयार केलेल्या पोस्टर्सची, त्यांच्या संदेश, सर्जनशीलता आणि सामाजिक प्रासंगिकतेसाठी खूप प्रशंसा केली गेली. सत्काराचे स्वरूप आणि कौतुक आणि प्रोत्साहन म्हणून विद्यार्थ्यांना छोटा पोलिस बॅजचे वाटप करण्यात आले. हा दिवस विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा आणि अभिमानाने भरलेला असल्याचे मुख्याध्यापिका सोनवणे यांनी सांगितले.

# सचिव, खजिनदारसह तीन निवड समिती सदस्य बिनविरोध

## नाशिक जिल्हा क्रिकेट संघटना निवडणूक : समीर रकटे सचिवपदी, हेमंत देशपांडे खजिनदार तर सतीश गायकवाड, तरुण गुप्ता आणि फय्याज गंजीफ्राकवाला निवड समिती सदस्य







**नाशिक ।** नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या त्रैवार्षिक निवडणुकीसाठी सचिव, खजिनदार आणि तीन निवड समिती सदस्यांची बिनविरोध निवड झाली. सन २०२५ ते २०२८ या कालावधीसाठीच्या निवडणूक कार्यक्रमानुसार, नामांकन पत्र वाटप , स्वीकृती व नामांकन अर्जाची छाननी प्रक्रिया दि. २३ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी ३ दरम्यान झाली. आज (दि. २४ एप्रिल) दुपारी ४.३० पर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. त्यानंतर अंतिम चित्र स्पष्ट होईल. आवश्यकता भासल्यास ३ मे रोजी मतदान होईल. दरम्यान, नामांकन पत्र वाटपाच्या दिवशी मुदत संपेपर्यंत एकूण २५ अर्ज प्राप्त झाले असून, छाननी अंती त्यातील चेअरमन पदाकरिता दोन व दोन जॉइंट सेक्रेटरी करिता ३ आणि दहा कार्यकारिणी सभासद पदांसाठी १५ नामांकन अर्ज प्राप्त झाले आहे. सेक्रेटरी, खजिनदार व तीन निवड समिती सदस्य पदासाठी अनुक्रमे एक, एक व तीन अर्ज प्राप्त झाल्यामुळे सेक्रेटरी : समीर अरुण रकटे. खजिनदार : १) हेमंत दत्तात्रय देशपांडे. निवड समिति सदस्य : सतीश लक्ष्मण गायकवाड, तरुण शिवशंकर गुप्ता, फय्याज शब्बीर गंजीफ्रॉकवाला. हे बिनविरोध निवड होणार हे निश्चित झाले आहे असे निवडणूक अधिकारी अॅड मनीष लोणारी यांनी सांगितले.

अध्यक्ष पदाकरिता धनपाल (विनोद) मोतीलाल शहा आणि महेश झुंजार आव्हाड हे रिंगणात आहेत. दोन जागा जॉइंट सेक्रेटरी करिता योगेश (मुन्ना) हिरे, चंद्रशेखर दंदणे, महेश देवबा भामरे आणि दहा कार्यकारिणी सभासद पदांसाठी पुढीलपप्रमाणे एकूण पंधरा जणांनी नामांकन पत्र भरले आहेत. संदीप श्रीकिसन सेनभक्त, महेश देवबा भामरे, महेन्द्र (राजू) कारभारी आहेर, राघवेंद्र जयंतकुमार जोशी, हेतल खेमचंदभाई पटेल, जगन्नाथ चंदु पिंपळे, शिवाजी भीमाजी उगले, अनिरुद्ध विनायक भांडारकर, निखिल रामनारायण टिपरी, विक्रांत प्रकाश मते, बाळासाहेब उमाजी मंडलिक, नितीन सदाशिव धात्रक, कैलाश लक्ष्मीनारायण भुतडा, ज्ञानेन्द्र सिंग सिसोदिया, अनिरुद्ध मुकुंद चिमठाणकर असे एकूण १५ अर्ज प्राप्त झाले आहे. निवडणूक अधिकारी आहेत अॅड. मनीष लोणारी आणि असोसिएट्स.

# कुठवर शांत बसणार?




**पर्यटकांना वाचविण्यासाठी सैय्यद हुसैन आतंकवाद्यांशी भिडला. रायफल हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला आणि आतंकवाद्यांच्या गोळीबारात जीव गमावला .**



**पंचनामा**
■ मनोज बागडे

पहलगाम येथील दहशतवादी हल्ला हादरवून सोडणारा आहे . या घटनेने प्रत्येक भारतीय पेटून उठला आहे, संताप धुमसतो आहे, पुरे झाली सहनशिलता, आता सूड उगवलाच पाहिजे, घरात घुसून मारायला हवे म्हणून भावना व्यक्त होत आहेत. आतंकवाद्यांनी निष्पाप २७ पर्यटकांना गोळ्या घालून ठार मारले.

या पर्यटकांचा भाजपा आणि त्यांच्या एनडीए सरकारशी संबंध नव्हता, कलम ३७० सोबत संबंध नव्हता, वक्फ बोर्डाशी त्यांचे घेणे देणे नव्हते. तरीही त्यांना जीव गमवावा लागला. गोळ्या झाडणाऱ्यांच्या संघटनेने याची जबाबदारी घेतली. पण, आमच्या सरकारचेही काही उत्तरदायित्व नाही का? पुलवामा घडल्यानंतर आम्ही बालाकोट स्ट्राईक केले. यावेळी आमचे निष्पाप नागरिक मारले गेलेत. आता कारवाई करायची नाही तर केंव्हा करणार? कुठवर अशी गांडुगिरी पोसत बसणार आहोत आम्ही?

आतंकवाद्यांनी धर्म विचारून गोळ्या झाडल्याचे सांगितले जाते. घटनास्थळी उपस्थित असलेल्या आणि प्रचंड भेदरलेल्या पर्यटकांनी आपबिती सांगितली, ती खरीच असावी. परंतु, समाज माध्यमांमध्ये नंतर ज्या पोस्ट आल्या, राजकारण्यांनी ज्या पद्धतीने गवगवा केला, त्यात काही बाबी प्रकर्षाने दडवून ठेवल्या गेल्या.

पहलगाममधल्या बैसरन इथं अतिरेकी पोहोचले. पर्यटकांना धर्म विचारु लागले तेव्हा त्यांना एका स्थानिक घोडेस्वाराने विरोध केला. घोडेस्वारीसाठी तो पर्यटकांना तिथं घेऊन आला होता. यांचा धर्म कोणताही असेल; पण हे सर्वजण निष्पाप आहेत. काश्मीरचे पाहुणे आहेत. कोणावरही गोळी झाडू नका, अशी विनंती त्याने केली. अतिरेक्यांनी त्याचं ऐकलं नाही.

या घोडेस्वाराने एका अतिरेक्याच्या हातातली एके ४७ रायफल हिसकावून घेतली. तोवर दुसऱ्याने त्याच्यावर हल्ला केला. धरपकड झाली आणि या घोडेस्वाराला गोळी लागली. रक्तबंबाळ झालेल्या या घोडेस्वाराला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आलं पण तोवर या घोडेस्वाराचा मृत्यू झाला होता. या घोडेस्वाराच्या विरोधामुळे अनेकांचे प्राण वाचले, असं पर्यटकांनी सांगितलं. सैय्यद हुसैन शाह असे या घोडेस्वाराचे नाव. घरात कमावणारा एकुलता एक पोरगा. तो अतिरेक्यांशी लढताना मृत्यूमुखी पडला.

धर्माच्या नावावर कुणी कितीही वणवा पेटवला तरी जसे धर्मांध विकृत अतिरेकी असतात तसेच त्या धर्मांधतेच्या विरोधात उभी राहणारी सैय्यदसारखी लढाऊ बाण्याची माणसंही असतात. या सैय्यदला एक सॅल्युट तर बनतोच.

पहलगामच्या घटनेतून कितीतरी प्रश्नांना जन्म दिला आहे. प्रधानमंत्री मोदी यांचा यापूर्वीचा दौरा रद्द होण्यापासून ते त्या भागात सुरक्षा व्यवस्था नसण्यापर्यंत. काही महिन्यांपूर्वी मोदी यांचा या भागातील दौरा आतंकी हल्ल्याच्या शक्यतेवरून रद्द करण्यात आला होता. आता हजारो पर्यटक त्या भागात जातात, आणि आतंकी हल्ला होवू शकतो, हे गृहित धरून पर्यटकांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा जवान तैनात का केले नव्हते? हल्ला झालेले ठिकाण हे काश्मीर बॉर्डरवर नसून इथून जवळपास साडेतीनशे किलोमीटर आहे या ठिकाणी पोहोचण्यासाठी किमान आठ तास प्रवास करावा लागतो. मग अतिरेकी पहेलगाम पर्यंत पोहोचले कसे? अतिरेक्यांकडून गोळीबारानंतर अर्धा तास उलटलातरी घटनास्थळी सुरक्षा रक्षक का पोहोचू शकले नाहीत? पहलगाम हत्यानंतर केवळ धर्म विचारून गोळ्या झाडण्यात आल्या, ही माहिती जशी झपाट्याने व्हायरल केली गेली, तशीच सुरक्षा व्यवस्थेतील गलथानपणा बाबतची उत्तरेही सरकारने तातडीने द्यावीत. केवळ धार्मिक कटुता ठेवून राजकीय लाभ उठविण्याचा प्रयत्न केला जाऊ नये.

गुप्तचर खात्यांना पुसटशी सुद्धा कल्पना का नव्हती? हे गुप्तचर खात्याचे अपयश मानायचे का? श्रेय घ्यायच्यावेळी पुढे असणारे नेते यावेळी स्वतःचे फेल्यूअर कबूल करतील का?

डॉ. मनमोहन सिंग देशाचे प्रधानमंत्री असताना नरेंद्र मोदी यांना त्यांना काही प्रश्न विचारले होते, सीमा सुरक्षा तुमच्या हातात असताना, आतंकवादी घुसतातच कसे? त्यांना शस्त्रांचा पुरवठा कसा होतो? त्यांना फंडिंग कशी काय केली जाते? आता मोदी प्रधानमंत्री आहेत आणि आतंकवादी हल्लेही सुरूच आहेत. त्यात निष्पाप भारतीयांचे जीव जाताहेत. त्याच प्रश्नांची उत्तरे आता प्रधानमंत्र्यांनी देण्याची वेळ आली आहे.

यात कुणावर टीका करण्याचा हेतू नाही, अशा कठीण प्रसंगी संपूर्ण देशवासी आणि विरोधी पक्ष देखील सरकारच्या सोबत आहेत. परंतु, देशातील सर्वसामान्य नागरिकांचे जीव स्वस्त आहेत, मरतात तर मरू द्या... हे धोरण यापुढे चालणार नाही. खड्डयात घाला तुमचे राजकारण. निष्पाप लोकांचे जीव घेणाऱ्यांना त्यांच्या घरात घुसून ठेचायला हवे. ■ ■ ■

पतीच्या कलेवराजवळ बसलेली ती...
तिचं डोकं थोडंसं वाकलेलं...
डोळे सुन्न.. अश्रूंना थांबवण्याचाही
प्रयत्न नाही... जणू तिच्या काळजात
कोणी खोलवर छिन्न केलेलं...
हे दृश्य पाहून मन तुटून पडलं...
ती काही बोलत नव्हती.. पण तिचं मौन
कधीच ऐकलेलं नव्हतं इतकं बोलत
होतं.
त्या मौनात..पतीच्या हरवलेल्या
हास्याचा आवाज होता,
एकत्र घेतलेली शेवटची छायाचित्रं...
आणि 'आपण दोघं सुट्टीवर आलोय' हे
निरागस स्वप्न... सगळं त्या क्षणात
काळाच्या तोंडात गेलं होतं...
त्या रक्ताच्या थारोळ्यात तिचा संसार
विखुरला होता...
तो फक्त नवरा नव्हता... तो तिचं
खांद्यावर टेकणारं बळ होता....
त्याच्या मिठीत ती विसावणारी एक
संपूर्ण दुनिया होती....
आता तो निष्प्राण... आणि ती...
एकट्यानं जिवंतपणे मृत्यू सहन
करणारी!
हे दुःख केवळ तिचं नाही...ते
माणुसकीचं होतं... प्रेमाचं
होतं...विश्वासाचं होतं...
ती बसली होती... पण उठवणं शक्य
नव्हतं.... कारण ती आता फक्त
शरीरानं होती... मनानं, काळजानं,
आत्म्यानं... ती त्या मरणातच
विरघळली होती...
हे दृश्य केवळ बघण्याचं नव्हतं...
ते अंतर्मनाने भोगायचं होतं...
शब्द हतबल झाले... आणि मन शून्य.
त्या नजरेत, त्या थरारात,
एक संपलेलं आयुष्य आणि एक न
संपणारा शोक कायमचा कोरला गेला.

---

# दौलत

(कालच्या अंकावरून पुढे)
---------------

'उचापतखोर' ही कथा काळू बाळू साळू माळू हे चार मित्र अस्सल दारूडे,उदारी बुडविणारी, चांगल्या कामात अडसर ठरणारे, गावात पत नाही लोकांचे त्यांना मत नाही अशीही इरसाल जोडी गावातील उच्चशिक्षित सरपंचांना त्रास देणे त्याची बदमानी करणे. प्रत्येक गावात दारूपुरते पैसे काढणारी ही टोळी खेडेगावात हौदास घालते, याचे प्रत्ययकारी चित्रण या कथेत आले आहे.

'शबनम'ही स्त्रीप्रधान कथा आहे. शबनम ही मुस्लिम अनाथ मुलगी तिचे पालनपोषण यशोधरा आणि मिलिंद या जोडप्यांनी करून तिला नृत्यांगना बनवलं. 'शबनम' ही आईवडिलांची आधार आहे. ती कोरोनाच्या काळात वडील मिलिंदला वाचविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करते. नृत्याची कला सादर करताना शबनम चक्कर येऊन पडते. तिला तिचि मैत्रीण नयना दवाखान्यात ॲडमिट करते. तिच्या पायाचे ऑपरेशन होते. तिच्या पायाची शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर ती घरी येते. तेव्हा यशोधरा नयनाला म्हणते माज्या काळजाच्या घडाला वाचवलीस म्हणून कृतज्ञभावना व्यक्त करते. रक्ताच्या नात्यापेक्षा ही मानलेले नाते कसे श्रेष्ठ असतात याची जाणीव करून देणारी ही महत्त्वाची कथा आहे.

'झुंजार पत्रकार' या कथेत पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा खांब मानली जाते. जे वृत्तपत्र किंवा पत्रकार विचारांनी तत्वाने पत्रकारिता करतात त्यांना आज समाजात मान सन्मान प्रतिष्ठा आहे. जे वृत्तपत्र किंवा पत्रकार हे पैशापुढे लाचार झाले आहेत, पत्रकारिता म्हणजे जगण्याचे साधन मानतात, अशा जम्यामुळेच पत्रकारिता बदनाम झालेली आहे हे प्रखर वास्तव निर्भिडपणे कथेत लेखकांनी मांडले आहे हे विशेष होय.

'सृजनोत्सव' ही कथा साकुर्ली खेडेगावातून नागपूरात कामासाठी स्थायिक झालेल्या नथूबा, कमलाबाई या कामगार दाम्पत्यांनी आपला मुलगा संजय बाबासाहेबांसारखा शिकून मोठा व्हावा ही त्यांची उत्कट इच्छा असते. संजू हा जिद्दी चिवट मिळेल ते काम करुन कुटुंब पोसणे आणि कविता लिहून कुसुमाग्रज, यशवंत मनोहर,केशव मेश्राम या कवीश्रेष्ठासारखं नाव कमविणे ही बाब त्याने काळजावर कोरून घेतली होती. खांद्यावर गॅस सिलिंडर आणि मस्तकात कविता असणाऱ्या कवीचे भावविश्व या कथेत लेखकांनी अचूकपणे टिपले आहे.

'उड्डाण' ही कथा वेधक वास्तववादी आहे. गणेशभाई पत्रकारांची मुलगी प्रतिक्षा प्रचंड आत्मविश्वास, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर विश्वसुंदरी होते. विश्वसुंदरी होण्यासाठी श्रीमंतच असावे लागते असे नसते तर त्यासाठी प्रयत्न करायला हवे. यश मिळत गेले की,लोकांचे सहकार्यही मिळत असते. डॉ. बाबासाहेबांची प्रेरणा घेऊन शिक्षण घेतलेल्या माणसाचं, समाजाच्या आयुष्याचं सोनं होते. प्रगतीची उड्डाण घेतल्याशिवाय प्रतिष्ठेचा सन्मान मिळत नाही. गरीबी, दारिद्रयामुळे खचून न जाता त्यातूनही आत्मविश्वासाने परिश्रम केल्यास यश हमखास मिळू शकते हा संदेश ही कथा नवीन पिढीला देते हेच तिचे वेगळेपण आहे.

'झुंज' ही कथा एका बुध्दीमान गरीबी, नियतीवर मात करून वैद्यकीय अधिकारी होणाऱ्या शबनमची यशोगाथा आहे. या संग्रहातील कथा प्रचंड आशावादी, प्रेरणादायी नवीन पिढीला शिक्षण घ्यायला, जीवन जगायला बळ देणाऱ्या आहेत. साहित्य शेवटी माणसाचं हित आणि गीत गाते हे कार्य जगतपुरिया यांच्या कथा प्रामाणिकपणे करताहेत हे विशेष होय.

'गिरजा' ही हृदयद्रावक कथा आहे. .रक्ताच्या नात्यापेक्षा जपलेली मानलेली नातीच खरी असतात याची जाणीव करून देणारी ही कथा आहे.

'ऐनुर आपा' ही एका मुस्लिम स्त्रीचे भावविश्व साकार करणारी कथा आहे. पती निधनानंतर नेटाने संसार करून मुलाला शिक्षण शिकविते. त्याला पाटबंधारे विभागात नोकरी लागते. त्याच्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्यामुळे शब्बीरची नोकरी जाते. झुंजार पत्रकार सत्यान्वेषी वृत्तपत्रात स्तंभलेखन करून न्याय मिळवून देतो आणि पुन्हा पुर्ववत शब्बीरला नोकरीवर घेतले जाते. पत्रकारितेची ताकद किती असते याची जाणीव करून देणारी ही कथा आहे.

----(क्रमशः)----
**डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे**
**उदगीर. ९९२२९६६५२६**
■ ■ ■

---

# मुर्शिदाबाद दंगलीचा अन्वयार्थ!


अभय गोखले

११ एप्रिलला पश्चिम बंगाल मधील मुर्शिदाबाद येथे झालेल्या दंगलीचे पडसाद देशभर उमटत आहेत.वक्फ कायद्याच्या विरोधात मुस्लिम समाजाने आयोजित केलेल्या आंदोलनाने उग्र रूप धारण केले आणि त्यानंतर झालेल्या हिंसाचारात हिंदू समाजातील दोघांची हत्या करण्यात आली. हरगोविंद दास आणि त्यांचे सुपुत्र चंदन दास या बापलेकांना, त्यांनी कोणताही अपराध केलेला नसताना निर्घृणपणे ठार मारण्यात आले

मुर्शिदाबाद हा मुस्लिमबहुल जिल्हा आहे. हा जिल्हा बांगलादेशच्या सीमेला लागून असल्याने तेथे गेली अनेक वर्षे सातत्याने घुसखोरी होत आहे. १९७७ ते २०११ हा प्रदिर्घ काळ पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर असलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीने बांगलादेश मधून होणाऱ्या घुसखोरीला उत्तेजन देऊन,त्या घुसखोरांना आपली व्होट बँक बनवले.

त्यानंतर २०११ मध्ये डाव्या आघाडीचा पराभव करून पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर आलेल्या तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी डाव्या आघाडीची री ओढली आणि बांगलादेशी घुसखोरांना, घुसखोरी करण्यास उत्तेजन दिले. या मुस्लिम व्होट बँकेच्या जोरावर ममता बॅनर्जी यांनी २०१६ आणि २०२१ च्या विधानसभा निवडणुका प्रचंड बहुमताने जिंकल्या.

या घुसखोरांना आधार कार्ड, इलेक्शन कार्ड, रेशनकार्ड विनासायास मिळाल्याने त्यांची घुसखोरी कमालीची वाढली. मुर्शिदाबाद जिल्ह्यात झालेल्या या घुसखोरीमुळे आता हा जिल्हा मुस्लिम बहुल झाला आहे.

अर्थात पश्चिम बंगाल मधील हा एकमेव मुस्लिम बहुल जिल्हा नाही, ही गोष्ट या ठिकाणी प्रकर्षाने लक्षात घ्यायला हवी. ममता बॅनर्जी यांनी मुस्लिम व्होट बँकेच्या जोरावर या जिल्ह्यावर मजबूत पकड मिळवली आहे.

ममतांच्या मुस्लिम धार्जिण्या धोरणामुळे या भागात घुसखोरांची दादागिरी वाढली असून, हिंदुंना सतत भितीच्या छायेखाली वावरावे लागत आहे. जो पर्यंत ममता बॅनर्जी या पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर आहेत, तोपर्यंत तेथील हिंदूंना भितीच्या छायेखाली वावरावे लागणार आहे.

पश्चिम बंगाल मध्ये मुस्लिम समाजाची लोकसंख्या साधारणतः ३० ते ३३ टक्के इतकी आहे.१९४७ पासून आजतागायत वेळोवेळी पूर्व बंगाल आणि आताचा बांगलादेश यामधून पश्चिम बंगाल मध्ये सातत्याने झालेल्या घुसखोरीमुळे, पश्चिम बंगालमधील लोकसंख्येचे संतुलन बिघडले असून, मुस्लिम समाजाची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे.

वक्फ कायद्याच्या विरोधातील आंदोलन हे एक निमित्त होते. हा कायदा पश्चिम बंगाल मध्ये लागू केला जाणार नाही,हे ममता बॅनर्जी यांनी जाहीर केल्यानंतरही त्या विरोधात हिंसक आंदोलन करण्याची गरजच काय होती.

महत्वाची गोष्ट म्हणजे हिंदूंवर हल्ला कशासाठी करण्यात आला? याचे उत्तर सरळ आहे ते म्हणजे हिंदूंवर हल्ला करण्यासाठी त्यांना काहीतरी निमित्त हवे होते.अशा प्रसंगी पश्चिम बंगालमधील पोलिस हे बघ्याची भूमिका घेत असल्याने हल्लेखोरांचे चांगलेच फावते.

मुर्शिदाबाद येथील हिंसाचारात हिंदूंची घरे जाळण्यात आली,त्यांची दुकाने लुटण्यात आली, अखेर भयभीत झालेल्या हिंदूंना तेथून पलायन करून, सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा लागला.त्या पलायन केलेल्या हिंदूपैकी काही जणांची त्या बाबतीतील प्रतिक्रिया पुरेशी बोलकी होती.त्यांनी सांगितले की आमच्याच देशात आम्ही निर्वासित झालो आहोत, आता तक्रार कुणाकडे करणार, असा त्यांच्या बोलण्याचा अर्थ होता.

त्यातील काहींनी तर आपल्या घरी पुन्हा परतण्यास नकार दिला, त्यांनी अशी भीती व्यक्त केली की आम्ही घरी परतलो तर ते पुन्हा आमच्यावर हल्ला करतील.त्यांचा पोलिसांवर विश्वास राहिलेला नाही.त्यांनी अशी मागणी केली की, ते रहात असलेल्या विभागात सीमा सुरक्षा दलाला कायमचे तैनात करण्यात यावे.

इकडे ममता बॅनर्जी यांना आपल्या व्होट बँकेची काळजी लागून राहिली आहे,कारण पुढील वर्षी पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या निवडणुका आहेत.त्या या सर्व प्रकरणाचे राजकारण करत आहेत.त्यांनी मुर्शिदाबाद येथील दंगलीला भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. थोडक्यात सांगायचे तर त्या दंगलीत निरपराध हिंदूंचे जे नुकसान झाले, त्याच्याशी ममतांना काही देणे घेणे नाही, असेच त्यांच्या निरनिराळ्या वक्तव्यांवरून दिसून येत आहे.

बांगलादेशमध्ये सातत्याने हिंदूंवर हल्ले होत आहेत, त्याबद्दल भारतातील हिंदूंना काळजी वाटणे, स्वाभाविकच आहे. परंतु पश्चिम बंगाल तर भारतातच आहे, त्या पश्चिम बंगालमध्ये असलेल्या मुर्शिदाबाद येथील हिंदूंना जिहादींच्या दहशतीमुळे आपले घर सोडून दुसरीकडे पलायन करावे लागत असेल तर त्याहून लज्जास्पद असे काहीच नसेल.
■ ■ ■

---

# वेध लागले सुट्टीचे

*मुलांना वेध लागले सुट्टीचे*
*मामाच्या गावाला जाण्याचे*
*मौज मज्जा मस्ती करण्याचे*
*मामाला त्रासून सोडण्याचे*

शाळेत जाणाऱ्या मुलांना सतत वाटतं असते कीं सुट्टीचा दिवस म्हणजे रविवार लवकर यावं, हा सर्वात जास्त बऱ्याच मुलांना आवडणारा दिवस, सुट्टीच्या दिवशी मुलांना खूप मज्जा मस्ती करावी वाटत असते. बऱ्याच मुलांच्या शाळा या सकाळी असतात. त्यामुळे मुलांना सकाळी लवकर उठाव लागते, मुलांची शाळेत जायची इच्छा जरी नसली तरीही आई जबरदस्तीने मुलांची तयारी करून शाळेला पाठवते. मुलांची पूर्ण झोप होवो किंवा नाही, तेच मुलं केव्हा रविवार येते, याची सतत मुलं वाट बघतात.

सुट्टीचा आनंद मुलं घेत असतात आणि सोमवार आला की तेच मग दप्तराच ओझं पाठीवर,तोच अभ्यास, मुलांना अशा वेळी नेहमी समजून सांगावं लागते, शिक्षण खूप महत्त्वाचे आहे, शिक्षणाने माणूस मोठा होतो, पण मुलांचं काही नाही त्यांना फक्त कसतरी शाळेला जाऊन, भरभर लिहून, पाठांतर करून अभ्यास संपवायचा असतो.

वर्षाच्या शेवटी वार्षिक पेपर येतात, तेव्हा मात्र मुलं या दरम्यान खूप आंनदात दिसतात. परीक्षेनंतर मामाच्या, मावशीच्या गावाला जायची लगबग सुरू होते. माहेरी गेल्यानंतर आई मुलांना बघून स्वतःचे बालपण आठवत असते, मुलं मामा बरोबर, मावशी बरोबर, आजी आजोबांन बरोबर खेळतात, मस्ती करतात. मामा श्रीमंत असो किंवा नसो पण मामा हा मामाच.

भाच्यांना हवं नको ते घेवून देतो, हट्ट पुरवतो. मुलंही मामाच्या खांद्यावर बसून सुट्ट्यांचा आनंद घेतात, कधी आंबे, कधी खरबूज तर कधी टरबूज. मामा मुलांना शेतात घेऊन जातो, शेतामध्ये मोठ झाड असते, झोके घ्यायला मामा त्या झाडाला दोर बांधून देतो आणि त्यावर मुलांना झोके घ्यायला सांगतो, प्रत्येक दिवशी वेगवेगळे खेळ ठरलेले असतात, मामा मुलांबरोबर वेगवेगळे खेळ खेळतो.

मुलांना मामाच्या गावाला गेल्यानंतर जसा आनंद वाटतो, तसाच मुलांच्या आईला सुद्धा वाटत असतो, माहेरी आल्यानंतर आईलाही थोडं कामापासून आराम मिळतो, काही दिवस का होईना पण मुलांबरोबर तिलाही आईच्या कडे म्हणजे माहेरी करमते. शाळेच्या सुट्यांचे एक एक दिवस खूप आनंदाने एन्जॉय करत धमाल करत निघून जातात, आणि पुन्हा मग मुलांना वेध लागते सुटीचे...

*शाळेच्या सुट्ट्यांचा वेध*
*मुलांना लागतो जेव्हा*
*मुलांना सतत वाटते*
*सुट्ट्या लागतात केव्हा*
----------------
**सौ. चैताली संगोपाल वरघट**
**मूर्तिजापूर, जि. अकोला.**
**9834583685**
■ ■ ■

---

## समाजाला आध्यात्मिक ऊर्जा देणारी संस्था!

साधारण ५-६ वर्षा पूर्वी मी एका मंदिरात सनातन संस्थेच्या ग्रंथ प्रदर्शन कक्षाला भेट दिली होती. त्यावेळी संस्थेच्या पूजा सामग्रिसह संस्थेच्या ग्रंथ संपदेची माहिती मिळाली. त्यातील अगदी सोप्या शब्दात, सण, धार्मिक व्रते, देवलेला कोणती फूले वाहावी, कोणता नामजप करावा, धार्मिक कृतीमागील शास्त्र, स्त्रीयांनी अलंकार का घालावे, कुंकू का लावावे ओटी कशी भरावी या दररोज आणि नेहमी करणाऱ्या कृती आणि अशा अनेक विषयावरील लहान मोठे पुस्तक (ग्रंथ) मिळाले.

ते वाचून खरोखर खूप छान वाटले. कारण आज जेव्हा किती तरी मुली आणि महिला पाश्चिमात्य संस्कृतिचे अंधानुकरण करतांना दिसतात पण आपली भारतीय प्राचिन महान संस्कृति आणि सनातन धर्म का आणि काय सांगतो? ते आपण विसरत चाललो आहे. त्यामुळे अशी माहिती सांगणारी संस्था आणि त्यांची पुस्तके आपल्या सर्वांसाठीच खूप महत्वाची आहेत.

आज आपणच ह्यातून मिळालेल्या माहितीनुसार आचरण करून येणाऱ्या पिढिला लव जिहाद सारख्या विळख्यातून वाचवु शकतो. आज आपण आपला धर्म जोपासला आणि आचरणात आणला तरच त्याचे रक्षण होणार आहे. त्यामुळे आध्यात्मिक, सामाजिक, धार्मिक विषयांचे ज्ञान त्यातून मिळते. समाजाला आध्यात्मिक ऊर्जा देणारी ही संस्था आहे, असे म्हणावे लागेल.

■ सौ. वर्षा आवदे
नागपूर.

**वाचक लिहितात**

## आम्ही फक्त धर्म विचारतो.. हिंदू.. मग गोळी खा...

ही एक ओळ पुरेशी आहे, एक सभ्य राष्ट्राच्या अंतरात्म्याला हादरण्यासाठी. जिथे मानवतेचा विजय व्हायला हवा, तिथे धर्माच्या आधारावर जीवनाचा निर्णय घेतला जात आहे, तीच खरी शोकांतिका आहे. पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात निष्पाप हिंदूवर गोळीबार झाला. रम्य, शांत परिसरात अस काही घडावं- हे केवळ त्रासदायक नाही, तर विचार करायला भाग पाडणारं आहे. हे फक्त एक माणसाचं हत्याकांड नव्हते, हा हल्ला होता विचारांवर, श्रद्धेवर, आणि एका संपूर्ण धर्मावर. आपण म्हणतो की, आतंकवाद्यांचा कोणताच धर्म नसतो. पण गोळी झाडण्यापूर्वी जर धर्म विचारला जात असेल, तर आपण डोळसपणे ही वाक्य किती वेळा उच्चारणार?

भारत हे विविधतेचं प्रतीक असलं तरी, आज हिंदू समाजच स्वतःच्या देशात असुरक्षित का वाटून घेतो? आज नवविवाहित जोडीदारांना आपला जोडीदार गमवावा लागला. हिंदू धर्मियांनाच का टारगेट करत आहे? ह्याचे कारण काय? तर भारतात त्यांचे बहुमत आहे. म्हणून धर्मवाद होतोय का? आपल्या धर्मावर प्रेम करणं, त्याचा अभिमान बाळगणे हा दोष नाही. उलट, जेव्हा आपल्या सभ्यतेला, श्रद्धेला अस्तित्वाला वारंवार आव्हान दिल्या जात आहे, तेव्हा धर्माभिमान ही आपली ढाल बनते. जात-पात, प्रांत, भाषेच्या भिंती झुगारून देण्याची हीच वेळ आहे. मी ब्राह्मण, मी मराठा, मी दक्षिण भारतीय, अस म्हणण्यापेक्षा मी हिंदू हे एकच ओळख बनवणे गरजेचे आहे.

जग काहीही बोलेल, पण आपण आपल्या धर्माचा अपमान, अत्याचार आणि निदोषांच्या हत्या यावर शांत राहणे हा गुन्हाच होईल. मुलांना धार्मिक शिकणासोबत, आत्मरक्षा, कायदेशीर माहिती देणे याचीही गरज आहे. तुमचा धर्म, तुमची संस्कृती, तुमची ओळख-हे सर्व तुमच्या हातात आहे. हिंदू म्हणून जर तुम्ही अभिमान बाळगत नसाल, तर उद्या तुमची किंमत विचारली जाणार नाही-धर्म विचारला जाणार!

धर्मांतर, लवजिहाद आणि विभाजनकारक शक्तींना प्रत्युत्तर देण्याची हीच ती वेळ आहे-विचाराने, शिक्षणाने आणि एकतेने आज वेळ आहे - फक्त श्रद्धा टिकवण्याची नाही तर हिंदू म्हणून संघटित होण्याची. आज हिंदू समाजच स्वतःच्या देशात असुरक्षित वाटून घेतो? सर्व धमार्ची शिकवण आपल्या मुलांना द्या पण कोणी आपल्या धर्मावर बोट उचलले आणि अत्याचार करत असेल तर बोट छाटायची ताकद, हिंमत आपल्यात असायला हवी. धर्माभिमान जागृत करणे ही काळाची गरज आहे. हिंदूंनो जातीने नाही, तर धर्माभिमानाने उठून उभे राहा!

■ राधा प्रमोद पिंपळापुरे, उमरेड.

---

# डाळिंब खाण्यासोबतच केसांना लावा... मिळतील आश्चर्यकारक फायदे...





प्रत्येक महिलेला तिचे केस लांब आणि रेशमी व्हावे असे वाटते. या काळात केस गळणे ही एक सामान्या समस्या झालेली आहे. या समस्येने अने त्रस्त आहेत. केसगळतीच्या समस्येवर मात करण्यासाठी महागडे प्रॉडक्ट वापरतात. पण त्यांचा फारसा फरक पडत नाही.

पातळ आणि गळून कमी झालेले केस यावर मात करण्यासाठी, केसांना मजबूत आणि सुंदर बनवण्यासाठी काही टिप्स आहेत . डाळिंब खाण्याचे फायदे आहेत, पण ते खाण्याव्यतिरिक्त तुम्ही केसांना देखील लावू शकता. डाळिंब हे केस सुंदर, रेशमी, मजबूत आणि लांब बनवण्याचा एक नैसर्गिक मार्ग आहे.

डाळिंब खाण्याव्यतिरिक्त डाळिंबाचे तेल किंवा मास्कद्वारे केसांना लावू शकता. डाळिंब हे एक सुपरफूड आहे जे जीवनसत्त्वे, ॲंटिऑक्सिडंट्स आणि फॅटी ॲसिडने समृद्ध आहे. केसांची काळजी घेण्यापासून ते एकूण आरोग्यापर्यंत, खूप फायदेशीर आहेत.

डाळिंबाचा रस तेलात मिक्स करून केसांना लावा. डाळिंबाच्या बियांचे तेल बाजारात उपलब्ध आहे. ज्यामध्ये प्युनिकिक ॲसिड आणि ओमेगा-५ फॅटी ॲसिडसारखे पोषक घटक असतात. ते तुमच्या टाळूमध्ये खोलवर मॉइश्चरायझेशन करते.

हे तेल दररोज केसांना लावा आणि मसाज करा. यामुळे तुमचे रक्ताभिसरण सुधारेल आणि तुमचे केसही मजबूत होतील. तसेच ज्यांचे केस खुप पातळ आहेत ते केसांना निरोगी देखील बनवते. डाळिंबाच्या बियांचे तेल लावण्यापूर्वी ते थोडेसे गरम करा. डाळिंबाचे तेल नसेल तर तुम्ही डाळिंबाचा रस तेलात मिक्स करून देखील ते लावू शकता. तासभर ठेवल्यानंतर केस शॅम्पूने धुवा.

**डाळिंबाचा हेअर मास्क**

खोल कंडिशनिंगसाठी घरी डाळिंबाचा हेअर मास्क बनवू केसांना लावू शकता. ताजे डाळिंबाचा रस घ्या आणि त्यात दही, मध योग्य प्रमाणात मिक्स करून त्यांची पेस्ट बनवा. ही पेस्ट केसांना व्यवस्थित लावा. ३० मिनिटे ठेवल्यानंतर कोमट पाण्याने धुवा. हा डाळिंबाचा हेअर मास्क केसांना हायड्रेट ठेवतो, तसेच केसांना चमक देतो आणि कुरळे केस मऊ आणि रेशमी बनवण्यास मदत करतो.
■ ■ ■

---

**अशोकायन**
प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## दे दणादण ..!

पाक भारताला
वारंवार डिवचतेय
आमचं सरकार कां बरं
कानाडोळा करतेय ..?

पाकच्या माकडचेष्टांनं
भारतमाता विचलीत
मोदीची द्या असा ठोसा
पाकन व्हावं चारीमुंड्या चित .

सौ सुनारकी एक लोहार की
अशीच करा गनिमी कृती
अठरा वेळा हल्ले करून
घेतलीय हिंदुंच्या
प्राणांची आहूती ..!

saibabasewamandal@gmail.com

Sai Mandir, Wardha Road, Nagpur



# कार्यालय नगर परिषद भद्रावती

## कर विभाग

**जाहीर निविदा सुचना**

सर्वसाधारण महिती करीता निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात येते कि, नगर परिषदेद्वारे लावण्यात आलेल्या LED स्क्रिन वर जाहिरात प्रसिद्ध करणे करीता जाहिरात देणे करीता संस्थेकडुन दर मागविणेबाबत. खालील कामाकरीता नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडुन व्दि-लिफाफा प्द्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.

निविदा प्रसिद्धीचा तपशिल

| | |
|---|---|
| निविदा फॉर्म विक्रिची तारीख व वेळ :- | दि. २५/०४/२०२५ ला सकाळी ११.00 वाजेपासुन |
| निविदा फॉर्म स्विकारणे अंतीम तारीख व वेळ :- | दि. ०८/०५/२०२५ ला दुपारी ३.00 वाजेपर्यंत |
| अनामत रक्कम स्विकारणे अंतीम तारीख व वेळ :- | दि. ०९/०५/२०२५ ला दुपारी ३.00 वाजेपर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक :- | दि. १३/०५/२०२५ ला दुपारी ३.00 वाजेपर्यंत (शक्य झाल्यास ) |

| अ.क्र | कामाचे नाव | निविदा प्रपत्र किंमत | निविदा अनामत |
|---|---|---|---|
| १ | २०२५-२०२६ या आर्थीक वर्षासाठी नगर परिषदेद्वारे लावण्यात आलेल्या LED स्क्रिन वर जाहिरात प्रसिद्ध करणे करीता जाहिरात देणे करीता संस्थेकडुन दर मागविणेबाबत. | १000/- | २000/- |

अटी व शर्ती :-

१) इतर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत संगणक विभागात पहावयास मिळतील.

मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद भद्रावती


# आज का अंदाज

शुक्रवार २५ एप्रिल २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ९ | ० | ३ | ४ | ७ | ८ |
| २५६ | २५९ | ५६८ | १४५ | २४७ | १५८ | १३३ | १२५ |
| ६८९ | १५० | ११७ | ३८९ | ६७० | ३४७ | ५५७ | ३५० |
| ३५५ | ६०० | ३७९ | २८० | ३५५ | ७८९ | २२३ | २६० |
| ३२ | ६२ | ९१ | ०१ | ३९ | ४१ | ७१ | ८१ |
| ३४ | ६४ | ९७ | ०७ | ३२ | ४२ | ७० | ८० |
| ३५ | ६५ | ९४ | ०८ | ३५ | ४५ | ७६ | ८६ |


२५ एप्रिल : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | ४९ | ५३ | ८३ |
| १७ | ४७ | ५० | ८० |
| १६ | ४६ | ५२ | ८२ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# शब्दकोडे क्रमांक २०९५



**आडवे शब्द :-**


१) झुकुझुकु आगिनगाडी गाण्यातील पुढची ओळ
८) दुर्बळ, असमर्थ
११) एक कडवे धान्य
१२) समुद्राचा किनारा
१४) गणेश
१६) सूर्य
१७) वजनदार
१८) अवधान
१९) गोमाता
२०) उंटाच्या पाठीवर उंचवटा
२२) ठाणवई
२५) एक चतुर्थांश
२६) एकरूपता
२८) इंद्रिय, घटक
३०) अभिप्राय
३१) राजाला न आवडणारी राणी
३३) फोडातील द्रव
३४) रात्रीचा अखेरचा प्रहर
३५) चामखीळ
३७) दरवाजा
३९) चीजवस्तू
४१) चहापिण्याचे जोडसाधन
४४) युद्ध
४६) नखे काडण्याचे हत्यार
४७) जखमेवरील जाद झालेले कातडे
४८) तृष्णा
५०) लाकडी तटबंदी
५१) मनाचा ओढा
५२) उत्तर भारतातील एक रामभक्त संत
५५) रंग
५६) सीतापती
५७) भारताचा नागरिक
६०) दु:ख, खेद
६१) आश्रय, टेका, प्रमाण
६२) गवंडी
६५) सेवक
६७) पती
६८) राजांचाही राज, सम्राट
७०) अर्धांगवायू
७१) मौज, गम्मत
७३) घाबरणे
७४) कोवळाअंकुर
७५) कपोल

**उभे शब्द :-**

२) अष्टविनायकातील एक गाव
३) सत्ताविसावे नक्षत्र
४) नगरपाल
५) लता
६) व्याकुळ, घाबरा
७) रास
८) चिवट
९) केसांची बट
१०) रात्रंदिवस
१३) दुलई
१५) दूध, पाणी
२०) माझा
२१) जिव्हा
२३) थोरवी
२४) परमेश्वर
२५) पाप दूर करणे
२६) आठवण
२७) खिडकीची काच
२८) शेळी
२९) परशुरामाची आई, रेणुकादेवी
३०) रात्रभर
३२) भीती
३५) चिंतन
३६) सासर (हिं.)
३८) करंडी
४०) दोन रत्ने
४१) लबाडी, कारस्थान
४२) थंड, गार
४३) जन्म मृत्यू
४५) प्रवासातील टप्पा
४७) धोका
४९) मोठा भाऊ
५१) कान
५२) देहूचे संत
५३) जानकी
५४) विचार मांडण्यासाठी बोलाविलेली बैठक
५५) जमीनजुमला
५६) कृष्णसखी
५८) प्रचंड रास, खरकटे वगैरेचा ढीग
५९) जेव्हा
६१) विश्रांती
६३) आगबोट
६४) पायजमा
६६) मनाला टोचणे
६९) सोन्याचा धागा, कलाबूत
७२) स्थान, जागृत

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



## महत्त्वाचे

### मनमाड येथील 'ते' सील केलेले देशी दारूचे दुकान सुरू पुन्हा आमरण उपोषणाचा इशारा

**नांदगाव ।** मनमाड येथील रेल्वे स्टेशनजवळ असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या पाठीमागील देशी दारूचे दुकान दि. २१ मार्च २०२५ रोजी रात्री अकरा ते बारा वाजेच्या दरम्यान राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी सील केले होते; परंतु दि.२३ एप्रिल २०२५ पासून पुन्हा ते कथित देशी दारूचे दुकान चालू करण्यात आले आहे. त्यामुळे सदरचे दारू दुकानास सील करण्यात यावे किंवा हटविण्यात यावे या मागणीसाठी पुन्हा आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा मनमाड येथील सामाजिक कार्यकर्ते रवींद्र निकम यांनी दिला आहे. निकम पुढे बोलताना म्हणाले की, मनमाड शहरातील डॉ. ;बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यामागील देशी दारू दुकानास कायमस्वरूपी सील होईपर्यंत पुन्हा आमरण उपोषण करणार असून, जीव जरी गेला तरी चालेल; पण मी मागे हटणार नाही.

### सरगम थिएटर्सतर्फे रविवारी अल्टीमेट बॉलिवूड ड्यूएट्स

**नाशिक ।** सरगम म्युझिक अ‍ॅकॅडमीच्या रौप्यमहोत्सवी वर्षानंतर सरगम थिएटर्सतर्फे रविवारी 'अल्टीमेट बॉलिवूड ड्यूएट्स' अर्थात हिंदी चित्रपटसृष्टीतील अविस्मरणीय युगुलगीतांची मैफल आयोजित करण्यात आली आहे. रविवारी (दि.२७) सायंकाळी ६ वाजता प.सा. नाट्यगृहात ही विनामूल्य मैफल होणार आहे अशी माहिती गायक, संगीत संयोजक नंदकुमार देशपांडे यांनी दिली. स्वतः नंदकुमार देशपांडे यांच्यासह घन:श्याम जाधव, सुरेंद्र जालिहालकर, अजय पाटील, संतोष कराळे, अमित गुरव तसेच गायिका अपर्णा माडीवाले, दीपाली घाटे, प्राजक्ता गायधनी, भाग्यश्री गायधनी, मयूरी मुर्डेश्वर लोकप्रिय युगुलगीते सादर करतील. त्यांना वाद्यसंगीताची साथसंगत प्रशांत महाले, अनोष आढाव, अभिजित शर्मा, फारुख पिरजादे, गौरव तांबे, बाबा सोनवणे हे कलाकार करणार आहेत. दिनेश गोविल निवेदन करतील तर पवन वंजारी ध्वनीसंयोजन करणार आहेत. नाशिककर रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहावे व कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### राज्यस्तरीय मंथन सामान्यज्ञान परीक्षेत मविप्र येवला होरायझनचा डंका

**नाशिक ।** राज्यस्तरीय मंथन सामान्यज्ञान परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून, यात मविप्रच्या येवला येथील होरायझन स्कूलच्या





विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. शिवतेज शिंदे याचा राज्य पातळीवर ४ था क्रमांक तर गार्गी लोखंडे ही राज्य पातळीवर ९ व्या रँकने उत्तीर्ण झाली. कार्तिकी घुले, अद्वय भावसार, शिवम बडदे, सिया लोणारी, अभिनंदन गायके, आर्यन पिंपळे, सोजस मोरे, अद्विका जोंधळे, मृणालिनी काळे, अपूर्व काकडे, अभिज्ञा काळे, विराज गुंजाळ, शिवप्रिया शिंदे या विद्यार्थ्यांनी या परीक्षेत नेत्रदीपक अशी कामगिरी केली. त्यांच्या या यशासाठी संस्थेचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे, येवला तालुका संचालक नंदकुमार बनकर, शिक्षणाधिकारी डॉ. कैलास शिंदे, मुख्याध्यापिका सुनीता हिंगडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### 'स्वाधार' योजनेच्या अर्जासाठी ३० एप्रिलपर्यंत अंतिम मुदतवाढ

**नाशिक ।** शैक्षणिक वर्ष 2024-25 साठी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर 'स्वाधार' योजना राबविण्यात येत आहे. मागील वर्षी स्वाधार योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांनी सन 2024-25 या वर्षासाठी नुतनीकरण करण्यास अर्जासाठी 30 एप्रिल 2025 पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या पोर्टलवर अर्ज विहित मुदतीत सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण नाशिकचे सहाय्यक आयुक्त देविदास नांदगावकर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरून त्या अर्जाची प्रत आवश्यक कागदपत्रांसह सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नाशिक, सामाजिक न्याय भवन, बी विंग नासर्डी पुलाजवळ, नाशिक-पुणे रोड, नाशिक कार्यालयात तात्काळ सादर करावेत. तसेच यापूर्वी स्वाधार योजनेचा अर्ज करणाऱ्या परंतु अर्जाची प्रत आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयात जमा न करणाऱ्या विद्यार्थ्यांनी व ज्या विद्यार्थ्यांचा ऑनलाईन अर्ज त्रुटी पूर्ततेसाठी SENT BACK केलेला असल्यास त्यांनी तत्काळ त्रूटी पूर्तता करून अर्ज 2 मे 2025 पर्यंत कार्यालयात जमा करावेत, असे आवाहनही सहाय्यक आयुक्त नांदगावकर यांनी केले आहे.

# कृषि उत्पन्न बाजार समिती सिन्नरला विविध विकासकामांचे भूमिपूजन; लोकार्पण सोहळा संपन्न

**सिन्नर ।** राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्या अंतर्गत व अंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचे निमित्ताने कृषि उत्पन्न बाजार समिती, सिन्नरने नाविन्यपुर्ण उपक्रमांतर्गत आज दि.२४/०५/२०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता मा. खासदार राजाभाऊ वाजे व तालुक्याचे सहकार विभागाचे सहाय्यक निबंधक संजय गिते यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध विकास कामांचा भुमिपुजन व लोर्कापण सोहळा पार पडला.

या प्रसंगी बाजार समितीचे सभापती गणेश घोलप, उपसभापती सिंधुताई कोकाटे यांच्यासह संचालक सर्वश्री शशिकांत गाडे, सुनिल चकोर, रविंद्र शेळके, जालींदर थोरात, शरद थोरात, श्रीकृष्ण घुमरे, प्रकाश तुपे, अ‍ॅड शरद चतुर, नवनाथ घुगे, नवनाथ नेहे, भाऊसाहेब खाडे उपस्थित होते.

बाजार आवारातील रस्त्याचे डांबरीकरण पावसाळ्यापुर्वी करणे गरजेचे असल्याने व त्या संदर्भात बाजार समितीकडे वारंवार शेतकरी व व्यापारी यांची मागणी असल्याने बाजार समितीने खात्याची परवानगी घेऊन व ई निविदा प्रक्रीया राबवून सदर काम ठेकेदार सतिष ढोली यांना मंजुर केले. सदर कामाचे भुमिपुजन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्याच प्रमाणे उन्हाची तिव्रता लक्षात घेऊन बाजार समितीत येणाऱ्या सर्व घटकांना R.O. फिल्टरचे पिण्यायोग्य थंड पाणी मिळावे यासाठी जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करण्यात आली. सदर केंद्राची पहाणी करुन लोर्कापण करण्यात आले. आधुनिक युगाच्या स्पर्धेत शेतकऱ्यांना बाजार समितीकडून शेतमाल





विक्रीसाठी दैनंदिन बाजारभाव ऑनलाईन बघता यावेत या हेतुने बाजार समितीने अद्यावत असे संकेतीक स्थळ (वेबसाईट) www.apmcsinnar.com या नावाने सुरु केलेली आहे. त्यावर बाजार समिती व उपबाजार विषयी माहिती, विविध पिकांचे बाजारभाव, विविध उपक्रम व बातम्या, परवानाधारकांची माहिती शासनाचे वेगवेगळे संकेतस्थळ इत्यादी बाबी प्रदर्शीत केल्या जातात. त्यानंतर ग्रामिण रुग्णालय, दोडी बु. येथील वैद्यकिय डॉ. अमृता कटारे, डॉ. विलास बोडके, डॉ. राहुल शेळके, राजकुमार आनेराव, संगिता गायकवाड, प्रतिभा गोणटे या पथकाने शेतकरी व हमाल-मापारी यांच्या करीता मोफत विविध तपासण्या शिबीर राबविले. बाजार समितीच्या टेरेस वरील सुरु असलेल्या शेडच्या कामाची देखील मान्यवरांनी पहाणी केली. बाजार समिती वेगवेगळे उपक्रम राबवून शेतकरी हित लक्षात घेऊन काम करत असल्याने व आवारातील स्वच्छता बघता मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी संजय सानप, केशव कोकाटे, सतिष ढोली, राजेंद्र जाधव, अशोक भालेराव, व्यापारी अनिल कलंत्री, शिवनारायण कलंत्री, बाबुशेठ लड्ढा, बाळकृष्ण चकोर, सतिष चकोर, पप्पु गोळेसर, सुनिल पन्हाळे, सुनिल चोथे, सुजित भाबड, दत्तात्रय नवले, तुषार नवले, उत्तम पालवे इ. उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाजार समितीचे सचिव विजय विखे व सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## लसूण घेऊन जाणारी पीक अप व्हॅन पलटी

**चांदवड ।** चांदवड-मनमाड रोडवर गणूर चौफुलीवर महाराष्ट्र स्पेअर दुकानसमोर बुधवारी (दि.२३) सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास पिकअप व्हॅन पीकअप पलटी होऊन त्याखाली



दुचाकी दबली गेल्याने तीन जण जखमी झाल्याची घटना घडली. त्यापैकी एकाची प्रकृत्ती गंभीर आहे. दोन जण जखमी आहेत. याबाबत चांदवड पोलीस स्टेशनला मदन रामलखन गुफा (रा. बिहार हल्ली रा. चांदवड) यांनी फिर्याद दिली की, पीकअप वाहन (क्रमांक एम.एम.१५/ जे.०७९४) वरील चालक दत्तू काळु भालेराव (रा. घोटी ता. ईगतपुरी) हा सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास लसून भरुन जात असतांना भरधाव वेगात चालवून घेऊन जात असतांना त्याचा पिकअपवरील ताबा सुटला. त्यामुळे पिकअप रस्त्यावर पलटी होऊन या अपघातात शिवदयाल महतो यास डोके, छाती व पायास गंभीर दुखापत झाली. अजय छोटेलाल पंडित यास उजव्या हातास, चेहऱ्याला गंभीर जखमी झाली. तसेच राम उदय महतो याला चेहऱ्यावर उजव्या बाजूस दुखापत झाली.

अपघातात पीकअप ही पलटी झाल्याने रस्त्याच्या कडेला असलेली दुचाकी दबली गेली असून, अपघातात सदरची पिकअप पलटी झाल्याने वरील तिघे गंभीर जखमी झाले व दुचाकीचेही नुकसान झाले. पीकअपचालक हा अपघाताची खबर न देताच पळून गेला. या घटनेची चांदवड पोलिसांत नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली व जखमींना रुग्णालयात दाखल केले. याबाबत तपास पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार स्वप्नील जाधव हे करीत आहेत.

## आयुष्याला नव्याने सामोरे जाण्याची प्रेरणा देणारा 'आता थांबायचं नाय' १ मेला येणार प्रेक्षकांच्या भेटीला

**नाशिक ।** झी स्टुडिओज् नेहमीच प्रेक्षकांना मनोरंजक, दर्जेदार आशय असलेले चित्रपट देत आले आहेत. झी स्टुडिओज्, चॉक अँड चीज फिल्म्स आणि फिल्म जॅझ मिळून आपल्यासाठी असाच एक सकारात्मक दृष्टिकोन देणारा चित्रपट आपल्या प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहेत. सहकुटुंब हसत खेळत प्रत्येकाला अंतर्मुख करायला लावणारा 'आता थांबायचं नाय' हा चित्रपट येत्या महाराष्ट्रदिनी म्हणजेच १ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

परीक्षा म्हंटल की पोटात गोळा येतो, पण या चित्रपटातील परीक्षेचे किस्से तुम्हाला कधी हसवतील, तर कधी रडवतील आणि जाताना नक्कीच काहीतरी देऊन जातील. या चित्रपटातील 'भोलानाथ'चे लहान मुलांचे मोठ्यांसाठी असलेले गाणे या चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिकच वाढवणारे आहे. यावर्षी लहानांच्या सुट्टीत मोठ्यांची शाळा आपल्याला या चित्रपटाच्या निमित्ताने पाहायला मिळणार हे नक्की. आपल्या दैनंदिन जीवनाच्या अडचणीतून वाट काढत आपल्या स्वप्नपूर्तीसाठी, यशासाठी झेप घेताना तुमच्या-आमच्या सारख्या एका सामान्य माणसाला कोणत्या गोष्टींना सामोरे जावे लागते आणि हा प्रवास यशस्वी होतो का हे पाहाण्यासाठी हा चित्रपट आहे.



या चित्रपटातील 'आता थांबायचं नाय' हे गाणे प्रदर्शित झाले असून जीवनाच्या नवीन प्रवासाचा, उंच भरारी घेण्याचा, नवे स्वप्न पाहण्याचा आणि ते पूर्ण करण्यासाठी घेतलेला ध्यासाचा आनंद व्यक्त करणारे हे गाणे आहे. या गाण्याला अजय गोगावले आणि आनंदी जोशी हिने आपल्या सुरांनी साज चढवला आहे. तर संगीतकार गुलराज सिंग यांनी सर्व गाणी संगीतबद्ध केली असून मनोज यादव गीतकार आहेत. या चित्रपटात उत्तम कलाकारांची फौज पाहायला मिळणार असून या चित्रपटाच्या निमित्ताने सुप्रसिद्ध अभिनेते भरत जाधव चार वर्षांनंतर पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकणार आहेत. या चित्रपटात भरत जाधव यांच्यासह आशुतोष गोवारीकर, सिद्धार्थ जाधव, प्राजक्ता हनमघर, किरण खोजे, प्रवीणकुमार डाळिंबकर, ओम भुतकर, पर्ण पेठे, श्रीकांत यादव आणि रोहिणी हट्टंगडी यांच्याही महत्वपूर्ण भूमिका आहेत. 'आता थांबायचं नाय'च्या निमित्ताने शिवराज वायचळ याने चित्रपट दिग्दर्शनात पदार्पण केले आहे. दिग्दर्शक शिवराज वायचळ म्हणतात, हा चित्रपट सत्यघटनेवर आधारित असून आयुष्यातील संघर्ष व पुढील वाटचालीसाठी एक प्रेरणादायी संदेश या चित्रपटातून प्रेक्षकांना मिळेल. वेगवेगळ्या धाटणीचे चित्रपट देणाऱ्या झी स्टुडिओजसोबत काम करण्याचा अनुभव अतिशय समृद्ध करणारा आहे. हा माझा पहिलाच चित्रपट. त्यातही अशी टीम लाभल्याने नक्कीच याचे फळ चांगले असेल, अशी आशा आहे. झी स्टुडिओज् प्रस्तुत, चॉक अँड चीज फिल्म्स आणि फिल्म जॅझ निर्मित या चित्रपटाचे लेखन ओमकार गोखले,अरविंद जगताप आणि शिवराज वायचळ यांनी केले आहे.

गुलराज सिंग यांचं धमाकेदार संगीत आणि मनोज यादव यांचे साजेसे गीतलेखन या चित्रपटाला लाभले आहे. चित्रपटाची निर्मिती उमेश कुमार बन्सल, बवेश जानवलेकर, निधी हिरानंदानी व धरम वालिया यांनी केली आहे. तर तुषार हिरानंदानी क्रिएटिव प्रोड्यूसर आहेत.

## शिवपुत्र संभाजी महानाट्याच्या रंगमंचाचे भूमिपूजन



### दि. ३० एप्रिल ते ५ मे होणार सादरीकरण

**नाशिक ।** ३० एप्रिल ते ५ मे दरम्यान होऊ घातलेल्या शिवपुत्र संभाजी महानाट्याच्या रंग मंचाचे बुधवारी भूमिपूजन झाले.

तपोवन साधुग्राम येथे महामंडलेश्वर सविंदानंद सरस्वती महाराज,-बीएपीएस स्वामी नारायण मंदिराचे स्वामी महाव्रत प्रभुजी, स्वामी दिव्यांनदं, ब्राम्हकुमारी संस्थेच्या विणा दीदी, महंत १०८ जनेश्वरानंद गिरीजी महाराज, जनार्दन स्वामी आश्रम वेरूळ प्रवक्ते भारत माता आश्रम अध्यक्ष, शिवपुत्र संभाजीचे लेखक दिग्दर्शक निर्माते महेंद्र महाडिक, विशेष सरकारी वकील पंकज चंद्रकोर, माजी नगरसेवक अरुण पवार, मधुकर हिंगमीरे, बिरारी सर, सहसचिव, पेठे हायस्कुल, अपूर्व पाटील, मनपाचे जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, कमलाकर गोडसे, किशोर अहिरराव यांच्या उपस्थितीत पार पडला. या रंगमंचाची आणि साधुग्राम मैदानाची विधिवत पूजा ज्ञानवर्धिनी प्रसारक मंडळ आणि तळ्याची वाडीचे संचालक गोपाळ पाटील आणि अंजली पाटील यांनी केली.

३० एप्रिल ते ५ मे दरम्यान होणाऱ्या शिवपुत्र संभाजी महानाटयमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका खासदार डॉ. अमोल कोल्हे साकारणार असून, मुंबई, पुणे, कोल्हापूर सातारा व नाशिक मधील १५० कलावंत या महानाट्य मध्ये काम करणार आहेत. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित हे महानाटय असून, कलावंताचा सराव देखील सुरू झाला आहे. ४० ट्रक रंगमंचाचे साहित्य तपोवन साधुग्राम येथे पोहोचले असून, ७ मजली भव्य रंगमंच आणि ९३०० प्रेक्षकांना आसन व्यवस्था करण्याचे काम भूमिपूजन सोहळा पार पडल्यानंतर सुरू करण्यात आले.

हजारो हातांना या महानाट्यामुळे रोजगार उपलब्ध होणार असून या कला पर्वणीत सहभागी होण्याचे आवाहन आयोजक गोपाळ पाटील, नचिकेत पाटील यांनी केले आहे.

# निळवंडे उच्चस्तरीय कालव्यातून दुष्काळी गावांना पाणी

## ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे शेतकऱ्यांनी मानले आभार । स्व. मधुकररावं पिचड यांची स्वप्नपूर्ती



**अकोले ।** निळवंडेची उपसा यंत्रणा कार्यान्वित झाल्यामुळे धरणातील पाणी पातळी मोठ्या प्रमाणात कमी झाली असतानाही उच्चस्तरीय पाईप कालव्यातून पाणी वाहू लागले. कडक उन्हाळ्यात कळस गावांच्या बंधाऱ्यात निळवंडेचे पाणी पोहोचले. उन्हाळ्यात आलेले पाण्यामुळे तेथील माणसांना दिलासा मिळाला असून, विहिरींच्या पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल.


जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे शेतकऱ्यांनी आभार मानले आहे. स्व. मधुकररावं पिचड यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण झालेची भावना आहे. संगमनेर येथे दोन दिवसापूर्वी जलसंपदा विभागाची बैठक ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षते खाली व आमदार डॉ. किरण लहामटे, आमदार अमोल खताळ पाटील, माजी आमदार वैभव पिचड, जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती कैलासराव वाकचौरे यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी अनेक शेतकऱ्यांनी प्रश्न उपस्थित केले. याबाबद सकारात्मक निर्णय घेत उच्चस्तरीयचे पाणी कळस गावाला आजपर्यंत आले नव्हते, असे निदर्शनास आणून दिले असता तातडीने कार्यवाही करीत पाणी पोहचले.

माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या संकल्पनेतून फक्त अकोले तालुक्यासाठी असणाऱ्या निळवंडे धरणाच्या उच्चस्तरीय पाईप कालव्यांचा लाभ तालुक्यातील २ हजार ३२८ हेक्टर क्षेत्रास होतो. डाव्या उच्चस्तरीय कालव्याची लांबी २०.६८ किमी, त्याचे लाभक्षेत्र ८७१ हेक्टर तर उजव्या उच्चस्तरीय कालव्याची लांबी १९.३७ किमी व लाभक्षेत्र १ हजार ४५७ हेक्टर आहे. उच्च स्तरीय पाईप कालवे तलांक ६२७.४० मीटरवरून सुरू होतात. निळवंडे जलाशयाची पूर्ण संचय पातळी तलांक ६४८.१५ मी. आहे. उच्च स्तरीय पाईप कालवा हा तलांक ६३० मी ते ६४८ मी. या गुरुत्वीय दबावाने संकल्पित करण्यात आलेला आहे. म्हणजेच धरणातील पाणीपातळी जेव्हा तलांक ६३० मी. ते ६४८.१५ मी. दरम्यान असते तेव्हाच या उच्चस्तरीय पाईप कालव्यातून पाणी देता येते. पाणीपातळी तलांक ६३० मी. पेक्षा कमी झाली की धरणात पाणी असूनही या कालव्याद्वारे पाणी देता येत नव्हते. उच्चस्तरीय कालवे प्रणालीकरिता उपसा यंत्रणेची उभारणी करण्यात आली आहे.

> उच्च स्तरीय कालवे झाले पासून कळस ला पाणी आले नव्हते मात्र संगमनेर च्या बैठकीत मुद्दा उपस्थित करताच जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली. माजी खासदार सुजय दादा विखे पाटील यांनी विशेष सहकार्य केले आहे. कैलासराव वाकचौरे यांनी प्रयत्न केले आहे.
>
> **– भाऊसाहेब वाकचौरे पाटील, माजी सरपंच, कळस**

जलाशयात तलांक ६१४ मी. येथून १९५ अश्वशक्तीच्या दोन पंपांद्वारे हा पाणी उपसा ५५० मिमी आकाराच्या पाईपद्वारे वितरण कुंडात जमा होते. या ठिकाणी पाणीपातळी तलांक ६४२ मी. ठेवली जाते. यामुळे उच्चस्तरीय कालव्यातून बाराही महिने पाणी पुरवठा करता येणार आहे. उन्हाळ्यात पाणी पाहायला मिळाले. हे पाणी ओढे, नाले, बंधारे यात सोडले जाते. पाणी जिरल्यामुळे भूगर्भातील पाणी पातळी वाढते. त्याचा लाभ त्या परिसरातील शेतकऱ्यांना होतो.

## मोठा अनुभव, अफाट कार्यक्षमता



# अस्मिता


## जुळ्यांना जन्म देताना...



## पर्याय स्व-प्रकाशनाचा



## 'स्लीप डिव्होर्स' घेताय?



## रागावर नियंत्रण हवं



## कोणती लिपस्टिक निवडणार?



## उन्हाळ्यातील सुपरफूड











# शेअर बाजारात सात दिवसांच्या तेजीला ब्रेक

## सेन्सेक्स 315 अंकांनी घसरला



**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

गेल्या ७ दिवसांपासून भारतीय शेअर बाजारात सुरू असलेली घसरण आज गुरुवार, २४ एप्रिल रोजी थांबली. सेन्सेक्स ३१५ अंकांनी घसरून बंद झाला. तर निफ्टी देखील २४,२५० च्या महत्त्वाच्या पातळीच्या खाली घसरला. यामुळे आज गुंतवणूकदारांना ८४,००० कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले. आजच्या व्यवहारात जवळजवळ सर्वच क्षेत्रांमध्ये विक्रीचा दबाव दिसून आला. मात्र, धातू आणि औषधनिर्माण यासारख्या काही निवडक क्षेत्रांचे शेअर्स वधारून बंद झाले.

निफ्टी फार्मा निर्देशांक १ टक्क्यांनी वाढला, तर एफएमसीजी आणि रिअल्टी निर्देशांक १ टक्क्यांनी घसरले. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक जवळजवळ स्थिर होते आणि त्यात किरकोळ वाढ दिसून आली. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स ३१५.०६ अंकांनी घसरून ७९,८०१.४३ वर बंद झाला. तर निफ्टी ८२.२५ अंकांनी घसरून २४,२४६.७० वर बंद झाला.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज २३ एप्रिल रोजी ४२९.६३ लाख कोटी रुपयांवर घसरले, जे मागील दिवशी म्हणजेच मंगळवार, २२ एप्रिल रोजी ४३०.४७ लाख कोटी रुपयांवरून कमी झाले. सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल

**सेन्सेक्स 79,801**

**निफ्टी 24,246**

८४,००० कोटी रुपयांनी कमी झाले आहे. दुसऱ्या शब्दांत गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ८४,००० कोटी रुपयांची घट झाली आहे.

सेन्सेक्समधील ३० पैकी १३ शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये इंडसइंड बँकेच्या शेअर्समध्ये सर्वाधिक ३.२४ टक्के वाढ झाली. यानंतर, अल्ट्राटेक सिमेंट, टाटा मोटर्स, टेक महिंद्रा आणि सन फार्मा यांचे शेअर्स ०.८७ टक्क्यांपासून ते १.७७ टक्क्यांपर्यंत वाढीसह बंद झाले.

सेन्सेक्समधील उर्वरित १७ शेअर्स आज घसरणीसह बंद झाले. यामध्येहिंदुस्तान युनिलिव्हर (HUL) चे शेअर्स सर्वाधिक ४ टक्क्यांनी घसरले. दुसरीकडे, भारती एअरटेल, आयसीआयसीआय बँक, महिंद्रा अँड महिंद्राच्या शेअर्समध्ये ०.५७ टक्क्यांवरून १.९६ टक्क्यांपर्यंत घसरण झाली.

दरम्यान, आज अमेरिकेच्या कॉमेक्सवर सोन्याची किंमत ३३४५.३० डॉलर्स प्रति औंस इतकी आहे तर चांदीची किंमत ३३.३६ डॉलर्स प्रति औंस इतकी आहे. यासोबत देशातील मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर सोन्याची किंमत ९४,७५१.०० रुपये प्रति १० ग्रॅम आहे तर चांदीची किंमत ९७,९२५.०० रुपये किलो इतकी आहे.

# पर्सोना नॉन ग्राटा म्हणजे काय?

## एखाद्या देशाला त्याचा वापर केव्हा करता येतो?

**नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने याला उत्तर देण्यास सुरुवात केली आहे. केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांकडून बुधवारी रात्री उशिरा पाकिस्तानचे सर्वोच्च राजदूत साद अहमद वॉरैच यांना दिल्लीत बोलावण्यात आले आहे. तसेच पाकिस्तानच्या लष्करी राजदूतांना पर्सोना नॉन ग्राटा नोटही सोपवण्यात आली आहे.

पर्सोना नॉन ग्राटा म्हणजे एखाद्या विशिष्ट देशात राजनयिक किंवा परदेशी व्यक्तीला प्रवेश किंवा राहण्यावर बंदी घालणे. पर्सोना नॉन ग्राटा घोषित केल्यानंतर आता पाकिस्तानी अधिकाऱ्यांना एका आठवड्यात भारत सोडावा लागणार आहे.

दरम्यान केंद्र सरकारने भारतात असेलेल्या पाकिस्तानी अधिकाऱ्यांना पर्सोना नॉन ग्राटा घोषित केल्यानंतर सर्वत्र, 'पर्सोना नॉन ग्राटा' या वाक्प्रचाराची चर्चा होत आहे. त्याबद्दल जाणून घेऊया.

**पर्सोना नॉन ग्राटा म्हणजे काय?**

पर्सोना नॉन ग्राटा हा लॅटिन वाक्प्रचार आहे ज्याचा अर्थ "अनावश्यक व्यक्ती" असा होतो. राजनैतिक भाषेत, पर्सोना नॉन ग्राटा हा वाक्प्रचार हा अशा डिप्लोमेट किंवा परदेशी व्यक्तीला सूचित करतो ज्याला एखाद्या विशिष्ट देशात प्रवेश करण्यास किंवा राहण्यास त्या देशाने मनाई केलेली असते.

डीडब्ल्यूच्या अहवालानुसार, १९६१ च्या राजनैतिक संबंधांसाठीच्या व्हिएन्ना कन्व्हेन्शनमध्ये या पदनामाला डिप्लोमेट अर्थ प्राप्त झाला. कराराच्या कलम ९ मध्ये असे नमूद केले आहे की कोणताही देश, त्यांच्या देशात असलेलेल्या इतर देशांच्या राजनयिक कर्मचाऱ्यांच्या पथकातील कोणत्याही सदस्याला "कोणत्याही वेळी आणि कोणतेही स्पष्टीकरण न देता" पर्सोना नॉन ग्राटा घोषित करू शकतो.

पर्सोना नॉन ग्राटा घोषित केल्यानंतर लगेचच, संबंधित व्यक्ती सहसा त्याच्या मायदेशी परतते. जर त्याने दिलेल्या मुदतीत देश सोडला नाही तर, तो देश "संबंधित व्यक्तीला मिशनचा सदस्य म्हणून मान्यता देण्यास नकार देऊ शकतो." कलम ९ मध्ये असेही म्हटले आहे की, एखाद्या व्यक्तीला देशात येण्यापूर्वीच पर्सोना नॉन ग्राटा घोषित केले जाऊ शकते.

**पर्सोना नॉन ग्राटा कधी वापरला जातो?**

व्हिएन्ना कन्व्हेन्शनच्या कलम ९ नुसार एखादा देश परदेशी व्यक्तीला कधी पर्सोना नॉन ग्राटा घोषित करू शकतो याबद्दल कोणतेही निश्चित नियम नाहीत.

ऐतिहासिकदृष्ट्या, इतर देशांच्या कृतींबद्दल नाराजी व्यक्त करण्यासाठी अनेक देशांनी याचा वापर केला असल्याचे पाहायला मिळते. शीतयुद्धादरम्यान, अमेरिका आणि सोव्हिएत युनियनने एकमेकांच्या राजदूतांना पर्सोना नॉन ग्राटा घोषित केल्याचे आपण पाहिले आहे.

**पाकिस्तान विरोधात पर्सोना नॉन ग्राटाचा वापर**

भारताचा विचार केला तर, २०१६ मध्ये दिल्ली पोलिसांनी संरक्षण संबंधित कागदपत्रांसह अटक केल्यानंतर, भारताने पाकिस्तान उच्चायोगाच्या एका कर्मचाऱ्याला हेरगिरीच्या कारवायांसाठी पर्सोना नॉन ग्राटा घोषित केले होते.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात कठोर पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांनी काल रात्री दिल्लीतील पाकिस्तानचे सर्वोच्च राजदूत साद अहमद वॉरैच यांना बोलावून त्यांच्या लष्करी राजदूतांसाठी औपचारिक पर्सोना नॉन ग्राटा नोट (भारत सोडण्यासाठी औपचारिक पत्र) सोपवली आहे.

# पाकिस्तानमधील सर्व राजकीय पक्ष एकत्र येऊन देशाचे संरक्षण करतील - चौधरी फवाद हुसेन

**इस्लामाबाद, दि. २४ वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतात संताप उसळला आहे. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्याचा वज्रनिर्धार भारताने केला असताना, भारताकडून कोणताही हल्ला किंवा धमकी आल्यास पाकिस्तानमधील सर्व राजकीय पक्ष एकत्र येऊन देशाचे संरक्षण करतील, असे पाकिस्तानचे माजी मंत्री चौधरी फवाद हुसेन यांनी म्हटले आहे. ते माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ पक्षाचे ज्येष्ठ नेते आहेत.

पाकिस्तानला कडक उत्तर देण्यासाठी भारताने कॅबिनेट सुरक्षा समितीच्या उच्चस्तरीय बैठकीत पाच निर्णय घेतले आहेत. सिंधू जल करार स्थगिती, पाकिस्तानी राजदूतांना मिळणारी लष्करी सल्लागारांची सेवा बंद, अटारी वाघा सीमा बंद, पाकिस्तानी नागरिकांना भारतात प्रवेश बंद आणि पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील कर्मचारी संख्येत कपात असे धोरणात्मक निर्णय घेत पहलगाममध्ये झालेल्या भ्याड हल्ल्याला भारताने सडेतोड जवाब दिला आहे. भारताच्या कडक निर्णयानंतर पाकिस्तानने चांगलीच धास्ती घेतली आहे.

या दहशतवादी हल्ल्याशी आमच्या देशाचा संबंध नसल्याचा दावा पाकिस्तानने केला आहे. आम्ही सर्व प्रकारच्या दहशतवादी हल्ल्यांचा निषेध करतो, अशी प्रतिक्रिया पाकचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी दिली आहे. पाकिस्तानचे माजी मंत्री चौधरी फवाद हुसेन यांनी भारताकडून कोणताही हल्ला किंवा धमकी आल्यास पाकिस्तानने एकसंघ राहून उत्तर द्यावे, असे आवाहन केले आहे. त्यांच्या एक्स पोस्टमध्ये त्यांनी लिहिले आहे की, पाकिस्तान राजकीयदृष्ट्या विभागलेला असला तरी आम्ही राष्ट्र म्हणून एक आहोत. जर भारताने हल्ला केला किंवा धमकी दिली, तर सर्व प्रमुख पक्ष एकत्र येऊन देशाचे रक्षण करू.

हल्ल्यानंतर भारतात काय घडतेय, याकडे लक्ष ठेवून असलेल्या फवाद हुसेन यांनी दुसरी पोस्ट करत मोदी सरकारने संयम बाळगावा, असे आवाहनही केले आहे. भारतीय कॅबिनेटने आपली सुरक्षा बैठक पूर्ण केली आहे. आशा आहे की सगळे शांत डोके ठेवून निर्णय घेतील आणि युद्धाच्या घोषणा देणाऱ्या मीडियाच्या दबावाला बळी पडून कोट्यवधी लोकांचे प्राण धोक्यात टाकणार नाहीत, असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, भारताने सिंधु जल कराराला तत्काळ स्थगिती दिल्यानंतर फवाद हुसेन यांनी आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार भारत भारतीय खोरे करार स्थगित करू शकत नाही. हे करार कायद्याचे घोर उल्लंघन असेल. या बालिश निर्णयाचा परिणाम फक्त पंजाब आणि सिंधमधील गरीब शेतकऱ्यांवर होईल, असे म्हटले आहे.

# कधीपर्यंत धर्म सांगून गोळ्या खात राहायच्या?

## - शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद

**सिवनी, दि.२४ वृत्तसंस्था**

"आपल्या देशातील मोठमोठे नेते वारंवार हे म्हणत असतात की, दहशतवादाचा कोणताही धर्म नाही. पण, या घटनेने सिद्ध केलं आहे की, दहशतवादाला धर्म असतो. नेत्यांनी आता असे बोलण्यापूर्वी विचार करायला हवा. दहशतवाद्यांनी धर्म विचारून आणि एका विशिष्ट धर्माच्या लोकांना मारले', असा संताप ज्योतिषपीठाचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी व्यक्त केला.



मध्य प्रदेशातील सिवनी येथे बोलत असताना स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याबद्दल भाष्य केले. 'असं काम राक्षसांशिवाय कुणीच करू शकत नाही. त्यामुळे दहशतवाद्यांना राक्षस म्हणणं सुरू केले पाहिजे', असे ते म्हणाले.

स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती म्हणाले, 'हिंदूंनी या घटनेतून धडा घ्यायला हवा आणि आपल्या पूर्वजांसारखा पराक्रम दाखवण्यासाठी तयार रहायला हवे. हिंदूंनी या घटनेतून शिकण्याची गरज आहे. हिंदूंना आव्हान दिलं जात आहे. आपली ओळख समजून घ्या आणि पूर्वजांनी केलेला पराक्रम पुन्हा करण्यासाठी तयार रहावं. कधीपर्यंत धर्म सांगून गोळ्या खात राहायच्या?", असा संतप्त सवाल त्यांनी केला.

शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी सरकारच्या भूमिकेवरही टीका केली. "ज्या लोकांनी दावा केला की, काश्मिरमध्ये सर्व काही व्यवस्थित झाले आहे. कलम ३७० हटवण्यात आले आहे आणि स्वर्ग भूमीचा आनंद घ्या. त्यांच्यावर दाव्यावर विश्वास ठेवूनच लोक तिथे गेले होते", असे ते म्हणाले.

"सरकारने आत्मपरीक्षण करायला हवे की, त्यांच्याकडून कुठे चूक झाली. घटनेनंतर प्रशासन त्यांच्या धाडसाचे ढोल बडवत आहे, पण घटना घडली त्यावेळी सुरक्षा व्यवस्था कुठे होती?", असा सवाल अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी केंद्र सरकारला केला आहे.

# धावत्या रेल्वेतून पाण्याची बाटली फेकली

## 14 वर्षीय मुलाचा मृत्यू; लोको पायलटला अटक

**राजकोट, दि. २४ प्रतिनिधी**

रेल्वेने प्रवास करताना अनेक जण चालत्या गाडीतून कचरा बाहेर फेकताना दिसतात. पण असे करणे कोणाच्यातरी जीव घेऊ शकतो याचा विचार केला जात नाही. गुजरातच्या राजकोट जिल्ह्यात असाच एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. १४ मार्च रोजी १४ वर्षीय बादल सिंह गोडठाकर याचा धावत्या रेल्वेमधून टाकलेल्या पाण्याच्या बाटलीमुळे मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

हा मुलगा शापर-वेरावल भागात रेल्वे रुळांच्या जवळ थांबला होता तेव्हा चालत्या ट्रेनमधून फेकलेली पाण्याच्या बाटलीने छातीत मार लागल्याने त्याचा मृत्यू झाला. ही पाण्याची बाटली थेट त्याच्या छातीत लागली आणि त्यानंतर त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले पण डॉक्टर त्याला वाचवू शकले नाहीत.

१ एप्रिल रोजी बादल याचे वडील संतोष सिंह यांनी एक औपचारिक तक्रार शापर वेरावल पोलीस ठाण्यात दाखल केली, यामध्ये घटनेच्या चौकशीची मागणी करण्यात आली होती. यानंतर ही घटना घडली त्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले, ज्यामध्ये ही बाटली नेमकी कुठून फेकण्यात आली याबद्दल माहिती समोर आली.



तपासात समोर आले की ही बाटली सहाय्यक लोको पायलट शिवराम गुर्जर याने रेल्वेबाहेर फेकली होती, जो घटना घडली तेव्हा जेतलसर जंक्शनवर पहिल्या डब्यात ट्रेनच्या लोको पायलटबरोबर प्रवास करत होता.

चौकशीनंतर ३१ वर्षीय शिवराम गुर्जरने बाटली फेकल्याची कबुली दिली आहे. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली आहे आणि भारतीय न्याय संहिताच्या कलम १०६(१) अंतर्गत त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे



# प्रेमाची सुंदर अनुभूती देणाऱ्या "सजना" चित्रपटाचे टायटल साँग लौंच

भारतीय संगीतप्रेमींना मंत्रमुग्ध करणारा "सजना" चित्रपटाचा टायटल साँग प्रदर्शित करण्यात आला आहे. प्रेमातील हळव्या भावनांना स्पर्श करत, या गीतामध्ये प्रेमातील गोडवा, आठवणी, आणि नात्यांमधील निखळपणा अगदी हृदयस्पर्शी पद्धतीने मांडण्यात आला आहे. गाण्याचं चित्रिकरण देखील अत्यंत नयनरम्य आहे. सुप्रसिद्ध गायक सोनू निगम आणि राजेश्वरी पवार यांच्या भावस्पर्शी आवाजात सजलेले हे गाणं प्रेमाची नाजूक आणि गहिरं भावना व्यक्त करते. या गाण्याला संगीत दिलं आहे ओंकारस्वरूप यांनी, तर गाण्याचे बोल लिहिले आहेत सुहास मुंडे यांनी. "सजना" हे गाणं केवळ एक संगीतकृती नसून, प्रेमाच्या भावना, आठवणी आणि नात्यांची गुंफण उलगडणारं एक सुंदर चित्रण आहे. गाण्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.




'सजना' ग्रामीण महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर आधारित एक प्रेमकथा आहे. या चित्रपटाची निर्मिती सुप्रसिद्ध चित्रकार शशिकांत धोत्रे ह्यांनी केली आहे तर कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सुद्धा शशिकांत धोत्रे ह्यांनी केलं आहे.

मराठी चित्रपटसृष्टीत प्रेम, भावना आणि संगीत यांचं अनोखं मिश्रण घेऊन येणारा "सजना" हा नवा चित्रपट २३ मे २०२५ ला आपल्या जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

**लोकरंजन**

# देवमाणूस परत येतोय झी मराठीवर

झी मराठीवर 'देवमाणूस'* मधला अध्याय या मालिकेचा प्रोमो प्रसारीत झाला आणि देवमाणूसच्या या तिसऱ्या सीजनमध्ये काय नवीन पाहायला मिळणार? यात कोण कोण कलाकार असणार? याची सगळीकडे चर्चा सुरू झाली. तर मालिकेत परत एकदा आपल्याला देवमाणसाच्या मुख्य भूमिकेत अभिनेता किरण गायकवाड दिसणार आहे. त्याच बरोबर आधीच्या दोन्ही सीजन गाजवणारी आणि तिच्या अस्सल गावरान भाषेने प्रेक्षकांच मन जिंकलेली सरू आज्जी म्हणजे रुक्मिणी सुतार सुद्धा असणार आहेत. तसेच या मालिकेत पहिल्या दोन सीझनप्रमाणेच गावातली अनेक नवीन इरसाल पात्र पाहायला मिळणार आहेत.




देवमाणूस - मधला अध्याय , या मालिकेची कथा, पहिल्या आणि दुसऱ्या सीजनच्या मधली आहे. डॉक्टर आजीतकुमार देव कातळवाडीतून निघून गेल्यानंतर आणि तो परत येऊन त्याला फाशी झाली, त्याच्या मध्ये तो कुठे होता? काय करत होता? तिथेही तो कसा पोहचला, त्याने कुणाला फसवल, माणसांच्या विश्वासाचा कसा गैरफायदा घेतला. हे सगळ आपल्याला देवमाणूस मधला अध्याय, या मालिकेत बघायला मिळणार आहे. आधीच्या दोन्ही सीजनप्रमाणे या मालिकेचही लेखन स्वप्नील गांगुर्डे आणि विशाल कदम हीच जोडगोळी करणार आहे. स्वप्नील गांगुर्डे पटकथा तर विशाल कदम संवाद लेखन करणार आहेत. त्यामुळे पहिल्या दोन्ही सीजनप्रमाणे याही मालिकेत उत्कंठा वाढवणारे कथानक आणि अस्सल गावरान म्हणी, खुसखुशीत संवाद असणार आहेत. या मालिकेचे दिग्दर्शन प्रसिद्ध दिग्दर्शक राजू सावंत करत आहेत. त्यांनीच आधीच्याही दोन्ही सीझनच दिग्दर्शन त्यांनी केलय. त्यामुळे देवामाणूसची जादू कायम राहणार हे निश्चित. *वज्र प्रोडक्शनच्या श्वेता शिंदे आणि संजय खांबे यांनी या मालिकेची निर्मिती केली असून, लवकरच तुम्हाला झी मराठीवर ही मालिका पाहायला मिळणार आहे.

**टेलीरंग**

# लव फिल्म्सच्या 'देवमाणूसमध्ये 'सई ताम्हणकर थिरकणार लावणीवर !

मराठी चित्रपटसृष्टीत आता उत्साह आणि सौंदर्याची लाट उसळणार आहे, कारण सगळ्यांची लाडकी अभिनेत्री सई ताम्हणकर 'देवमाणूस' या बहुप्रतिक्षित चित्रपटात 'आलेच मी' म्हणत पहिल्यांदाच शानदार लावणीवर थिरकणार आहे. हा चित्रपट २५ एप्रिल २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.लव फिल्म्सच्या लव रंजन आणि अंकुर गर्ग यांची निर्मिती असलेला आणि तेजस देऊस्कर दिग्दर्शित या चित्रपटात महेश मांजरेकर, रेणुका शहाणे, सुबोध भावे आणि सिद्धार्थ बोडके यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

**सिनेरंग**

विविधांगी भूमिका साकारून आपली छाप पाडणारी सई, 'आलेच मी' या गाण्यातून एका वेगळ्याच अविष्कारात प्रेक्षकांसमोर येत आहे. पारंपरिक मराठी संगीतसृष्टीत आपली खास ओळख असणाऱ्या बेला शेंडे यांच्या दमदार आवाजात हे गीत साकारण्यात आले असून रोहन प्रधान यांनी त्यांना साथ दिली आहे. रोहन-रोहन यांचे संगीत लाभलेले हे गाणे तेजस देऊस्कर यांनी लिहिले असून रोहन गोखले यांनीही अतिरिक्त गीतलेखन केले आहे. सुप्रसिद्ध लावणी तज्ज्ञ आशीष पाटील यांनी या गाण्याची नृत्यरचना केली आहे, जी अत्यंत जोशपूर्ण आणि सुरेख आहे.'आलेच मी' हे गाणे त्याच्या भन्नाट बीट्स, आकर्षक सादरीकरण आणि सईच्या जबरदस्त उपस्थितीमुळे लवकरच टॉप लिस्टमध्ये झळकण्यास सज्ज आहे.लव फिल्म्स प्रस्तुत, तेजस प्रभा विजय देऊस्कर दिग्दर्शित आणि लव रंजन व अंकुर गर्ग निर्मित देवमाणूस २५ एप्रिल २०२५ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# पाकिस्तानचा गळा कापण्याची वेळ, इस्रायलसारखा बदला घ्यावा; अमेरिकेतून दिला गेला सल्ला

**नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर आता भारतातच नाही तर जगातही संताप व्यक्त होत आहे. धर्म विचारून, खतना केलाय का हे कपडे उतरवून पाहिले गेले आणि पर्यटकांना गोळ्या झाडण्यात आल्या. यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दहशतवाद्यांनी विचारही केला नसेल अशी कारवाई केली जाणार असल्याची घोषणा केली आहे. या काळात अमेरिकेच्या पेंटागॉनच्या माजी अधिकाऱ्याने इस्रायलसारखा बदला घ्यावा, आता कोणताही मार्ग उरलेला नाही, असे म्हटले आहे.

पेंटागॉनचे माजी अधिकारी मायकल रुबिन यांनी या हल्ल्याला पाकिस्तानी लष्कर प्रमुखांच्या काही दिवसांपूर्वीच्या भाषणाला जबाबदार धरले आहे. असीम मुनीर यांनी काही दिवसांपूर्वी भारताविरोधात गरळ ओकली होती. काश्मीर आणची गळ्याची नस होती. ती नसच राहणार आहे. आम्ही हे विसरणार नाही. आमच्या काश्मीरी भावांना त्यांच्या संघर्षकाळात सोडणार नाही, असे मुनीर यांनी म्हटले होते. यावर रुबिन यांनी म्हटले की, आता या हल्ल्यानंतर स्पष्ट आहे, भारताला पाकिस्तानचा गळा कापण्याची गरज आहे. यामध्ये कोणताही किंतू-परंतू असता नये.

पाकिस्तान हे लष्कर-ए-तैयबासह अनेक दहशतवादी संघटनांचे माहेरघर आहे, हे आम्हाला माहिती आहे. दुर्दैवाने पाकिस्तानी राजदूतांनी पाश्चिमात्य देशांना मूर्ख बनविले, यामुळे दहशतवादविरोधी कारवाईचा अभाव होता. बांगलादेशमध्येही आता ही समस्या पसरत आहे. तार्किक आणि वैचारिकदृष्ट्या पाहिले तर पाकिस्तानची आयएसआय यामागे आहे, तसेच एकमेव देश ज्यावर सध्या या हल्ल्याचा दाट संशय आहे, असे रुबिन यांनी मत मांडले.

कालचा दहशतवादी हल्ला हा ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्रायलवर केलेल्या हल्ल्यासारखेच आहे. तो हल्ला विशेषतः ज्यूंवर होता. आता मध्यमवर्गीय हिंदूंना लक्ष्य करून, पाकिस्तानीही तीच रणनीती अवलंबत आहे. अशा परिस्थितीत इस्रायलने हमाससोबत जे केले तेच पाकिस्तान आणि पाकिस्तानच्या आयएसआयसोबत करणे गरजेचे आहे. आयएसआयच्या नेतृत्वाला संपवून त्यांना दहशतवादी गट म्हणून घोषित करण्याची आणि भारताचा मित्र असलेल्या प्रत्येक देशाने असे करण्याची अशी मागणी करण्याची वेळ आल्याचे ते म्हणाले.

# 'खुदा से तो डरो, आता तुम्ही शून्याच्याही खाली जाणार'

## पाकिस्तानी प्राध्यापकाची स्वतःच्याच देशावर टीका

**नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानविरोधात आक्रमक भूमिका घेण्याची मागणी सुरू झाली आहे. भारताने सिंधू पाणी करार थांबवला आहे. पाकिस्तानी नागरिकांसाठी व्हिसावर निर्बंध आहेत, तर दूतावासातील अधिकाऱ्यांनाही परत जाण्यास सांगितले आहे. अटारी सीमेवरून होणारी वाहतूक पूर्णपणे बंद केली आहे. तर दुसरीकडे पाकिस्तानचे म्हणणे आहे की या घटनेशी त्यांचा काहीही संबंध नाही. पण पाकिस्तानचे प्राध्यापक इश्तियाक अहमद यांनी पाकिस्तानलाच सुनावले आहे.

इश्तियाक अहमद म्हणाले की, हा कसला योगायोग आहे की काही दिवसांपूर्वीच पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी भारत आणि हिंदूविरुद्ध द्वेष व्यक्त केला आणि त्यानंतर असा हल्ला झाला, यामध्ये निष्पाप लोक मारले गेले.

इश्तियाक अहमद म्हणाले की, पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांना आपण हिंदूंपेक्षा वेगळे आहोत असे म्हणण्याची काय गरज होती. पाकिस्तानमध्येच अशांतता असताना त्यांनी द्विराष्ट्र सिद्धांतावर भर दिला. ते स्वतःला भारत आणि हिंदूंपेक्षा वेगळे म्हणतात, पण त्यांचा चीनशी काय संबंध आहे?, असा सवालही त्यांनी केला.

'चीन आपला काका वाटतो का?' ते नास्तिक आहे. तिथे इस्लामचा नाश होत आहे. तुम्ही तिथे गप्प आहात, पण तुम्ही पाकिस्तानला पुन्हा अडचणीत आणले आहे. आमच्यासारख्या लोकांना वाटते की व्यापारी मार्ग उघडले पाहिजेत आणि भारतापासून मध्य पूर्वेकडे व्यवसाय सुरू झाला पाहिजे, असंही प्राध्यापक म्हणाले.

प्रोफेसर इश्तियाक अहमद म्हणाले की, भारतासोबत चार युद्धे झाली आहेत आणि आपण काश्मीर घेऊ शकलो नाही. उलट, आपण आपल्याच देशाचे विभाजन केले. जगभरात पुन्हा एकदा बदनामी होईल. असे म्हटले जाईल की हा देश दहशतवादाला पाठिंबा देतो. पाकिस्तानमध्ये संपूर्ण सत्ता लष्करप्रमुखांकडे असते आणि ते द्विराष्ट्र सिद्धांतासारख्या गोष्टींबद्दल बोलतात. पाकिस्तान चुकीच्या गोष्टी करत आहे. आता भारतीय लोक याला प्रतिसाद देतील की सहन करतील, मला माहित नाही, असंही ते म्हणाले.

प्रोफेसर इश्तियाक अहमद म्हणाले की, पाकिस्तानमध्ये सरकार स्थापनेतही एक खेळ होता. शाहबाज शरीफ हे लष्कराच्या मदतीने सत्तेवर आले आहेत आणि म्हणूनच ते लष्करासमोर झुकत आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

"लष्करप्रमुखांनी विधान केले आणि तिथे निष्पाप पर्यटकांना मारण्यात आले. देवाचे भयही असले पाहिजे. जगात पाकिस्तानची विश्वासार्हता आधीच शून्य आहे. आता आलेख शून्याच्या खाली जाईल, असा घरचा आहेर प्रोफेसर यांनी पाकिस्तानला दिला.

# टीम इंडियाचे हेड कोच गौतम गंभीर यांना जीवे मारण्याची धमकी

**नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था**

भाजपचे माजी खासदार आणि टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांना 'आयएसआयएस काश्मीर' कडून जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. या प्रकरणी गंभीर यांनी बुधवारी दिल्ली पोलिसांशी संपर्क साधून तातडीने दखल घेण्याची मागणी केली. त्यांनी औपचारिकपणे राजिंदर नगर पोलिस स्थानकाचे एसएचओ आणि दिल्ली सेंट्रलचे डीसीपी यांच्याकडे एफआयआर नोंदवण्यासाठी तक्रार दाखल केली आहे.



त्यांनी त्यांच्या कुटुंबाची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याची विनंती सुरक्षा यंत्रणांकडे केली आहे. या धमकीचे गांभीर्य लक्षात घेता, दिल्ली पोलिस या प्रकरणी सखोल चौकशी करतील. तसेच गंभीर आणि त्याच्या कुटुंबियांच्या सुरक्षेसाठी तातडीने पावले उचलतील, अशी अपेक्षा आहे.

२२ एप्रिल रोजी गंभीर यांना धमकीचे दोन ईमेल मिळाले. एक दुपारी आणि दुसरा संध्याकाळी ईमेल आला. दोन्हीमध्ये 'IKillU' असा धमकीचा मेसेज होता. गंभीर यांना अशा धमक्या मिळण्याची ही पहिलीच वेळ नाही. नोव्हेंबर २०२१ मध्ये, गंभीर खासदार असताना त्यांना असाच एक ईमेल आला होता.

दरम्यान, पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याच्या घटनेबद्दल गंभीर यांनी निषेध व्यक्त केला होता. या हल्ल्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाला. ''मृतांच्या कुटुंबियांप्रति माझ्या संवेदना. यासाठी जबाबदार असलेल्यांना किमत मोजावी लागेल. भारत स्ट्राइक करेल.'' असे २२ एप्रिल रोजीच्या X वरील पोस्टमध्ये गंभीर यांनी म्हटले होते.

गंभीर व्यतिरिक्त सचिन तेंडुलकर, विराट कोहली, सूर्यकुमार यादव यासह अनेक क्रिकेटपटूंनीही पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला. भारताचे माजी क्रिकेटपटू श्रीवत्स गोस्वामी यांनी पाकिस्तानसोबतचे क्रीडा संबंध पूर्णपणे तोडण्याची मागणी केली आहे.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com